नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १८७ * * अकोला * शुक्रवार, दिनांक ९ जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## कार दुभाजकाला धडकली, ४ विद्यार्थ्यांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, रंगारेड्डी, दि. ७ :
तेलंगणातील रंगारेड्डी जिल्ह्यातील चेवेल्ला परिसरात एका भरधाव कारची डिवाइडरला धडक बसली. या अपघातात आयसीएफएआय बिझनेस स्कूलच्या चार विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. अपघातात एक विद्यार्थिनी जखमी झाली असून, तिची प्रकृती गंभीर आहे.
कार डिवाइडरला धडकल्यानंतर झाडात घुसली. पोलिसांनी सांगितले की, हा अपघात रात्री दीडच्या सुमारास मोकीला पोलीस ठाण्याच्या हद्दीत झाला. सर्व विद्यार्थी मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीतून परत येत होते. वेगाने गाडी चालवत असल्यामुळे चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले. अपघातात कार पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. चारही मृतकांची ओळख पटली आहे.

## भारत आणि जय जगत




भारत १४० कोटींपेक्षा जास्त लोकसंख्येचा देश आहे. जेव्हा भारत स्वतंत्र झाला तेव्हा आपली लोकसंख्या ४० कोटी होती, त्यानंतर पुढील अनेक वर्षे आपल्याला अमेरिकेकडून धान्य आयात करावे लागले. त्या धान्या बरोबरच गाजर गवत आपल्या देशात आले, सध्या गाजर गवताने संपूर्ण भारतामध्ये हातपाय पसरलेले आहेत. ज्या काळी आपली लोकसंख्या कमी होती त्यावेळी आपल्याला अन्नधान्य आयात करायला लागत होते. त्यानंतर आपण हरितक्रांतीच्या मार्गाने वाटचाल केली त्यामुळेच आज १४० कोटींच्या जनतेला आपले शेतकरी गहू आणि तांदूळ पुरवतात. सध्या अमेरिकेला आपल्या देशात त्यांची शेती उत्पादने विकण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे धमक्या द्याव्या लागत आहेत, सरकार कोणाचेही असले तरी शेतीच्या बाबतीत आणि देशात पिकणाऱ्या पिकांच्या बाबतीत आपण अमेरिकेला मुभा देऊच शकत नाही. ही आपली प्रगती निश्चितच डोळ्यात भरण्यासारखी आहे. तरीही रोजगार, अन्नधान्य आरोग्य, त्यासोबत शिक्षण आणि देशातील मार्गांची म्हणजे दळण वळणाची सुयोग्य साधने ही आपली प्राथमिक गरज आहे, ती सरकारला पूर्ण करणे भाग आहे. पण हे सर्व करताना आपल्या देशातील हवा, आपल्या देशातील पाणी, आपल्या देशातील जमीन यांची परिस्थिती काय आहे याचा विचार केला तर आपण कुठे आहोत हा सुद्धा एक प्रश्न आहे. कारण हिमालयाच्या पायथ्यावर असलेल्या उत्तराखंडात किती भयानक परिस्थिती आहे याची कल्पनाच केलेली बरी. धान्याचे कोठार असणाऱ्या पंजाबवर न फिटता येण्याइतके कर्ज आहे, त्यांची जमीनही खराब झालेली आहे. आज आपल्या देशात पूर्वी शेती उत्पन्नासाठी जेवढी जमीन होती त्यामध्ये घट झालेली आहे. कारण विकासासाठी किंवा मोठ्या प्रमाणात वाढलेल्या लोकसंख्येसाठी पिकणारी २०% जमीन शेतीतील उत्पादना ऐवजी सडका, कारखाने, घरबांधणी यासह अनेक प्रकल्प यासारख्या इतर गोष्टीसाठी वापरण्यात आलेली आहे. आपल्याला जी जमीन मिळालेली आहे, तिचा असीमीत उपयोग करून आपण विकास तर केला आहे पण या विकासाच्या नावाखाली आपण काय काय गमावलेले आहे त्यावरही लक्ष ठेवले पाहिजे. ज्यांचे वय आज घडीला ६० वर्षांच्या पुढे आहे त्यांना आपण काय काय गमावले हे विचारले पाहिजे. भारताच्या प्रत्येक गावात कोणे एकेकाळी म्हणजेच फारतर ५० वर्षांपूर्वी बारमाही पाणी असणारी नदी वाहत होती. त्या नदीचे पाणी पिण्यायोग्य होते. उन्हाळ्याच्या शेवटी शेवटी त्या नदीची माती किंवा रेती फक्त हाताने काढली तरी त्यातून येणाऱ्या झऱ्याच्या पाण्याने तहान भागत होती. आज ४०-५० फूट खोदल्यावरही नदीमध्ये म्हणजेच नदीच्या पात्रामध्ये पाणी मिळत नाही, याचे कारण या नद्यांमधील बहुतांश रेती आणि माती आपण नष्ट केलेली आहे आणि आजही तेच सुरू आहे. तरीही आपल्या देशात एक बरे आहे की, आपण अजून अमेरिका किंवा पश्चिमी राष्ट्रांच्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर कार्बन वायू सोडत नाही. मुंबई, दिल्ली सारखी काही शहरे सोडल्यास अजूनही आपले जीवन त्यांच्याइतके अत्याधुनिक नाही. भविष्याच्या पोटात काय दडले आहे याची कल्पना केल्यावर जे दृश्य समोर दिसते, त्यामध्ये आपली प्राचीन आणि साधी जीवनशैली टिकून राहील की नाही याचीच शंका वाटते. आमचे हे विचार कदाचित सर्वांनाच प्रतिगामी पणाचे वाटतील परंतु वस्तुस्थिती भयावह आहे, यामध्ये अजिबात शंका नाही. आपल्याला कुठेतरी भविष्याचा विचार आपल्या देशाच्या एकूण वातावरणातच करावा लागेल. आम्ही वर उल्लेख केलेल्या राष्ट्रांनी पृथ्वीचे केलेले शोषण गुन्हेगारी स्वरूपाचे आहे पण त्या बलाढ्य राष्ट्रांवरती कारवाई कोण करणार. जगातील ५० ते ६० राष्ट्रांच्या पापामुळे हे जग गॅसचेंबर बनते की काय अशी स्थिती निर्माण झालेली आहे. काही वर्षांपूर्वी आम्ही जेव्हा काही ठिकाणी बोलताना भविष्यात आपल्याला पाणी विकत घेऊन प्यावे लागेल असे सांगत होतो. तेव्हा तेथील श्रोते आमची टिंगल उडवीत असत, आज जनतेला थेंबा-थेंबासाठी पैसे मोजून पाणी घ्यावे लागते आणि प्यावे लागते. विकासाच्या या घोडदौडीत भारताला कुठेतरी क्रांतिकारी परिवर्तन करण्याशिवाय गत्यंतर नाही, हे सूर्य प्रकाशाइतके स्वच्छ आहे. आपली पिढी आणि फारफार तर पुढची एखादी-दुसरी पिढी इथपर्यंतच ठीक आहे. मात्र, त्यानंतरच्या पिढ्यांना कसे आणि काय परिणाम भोगावे लागतील. याची चिंता ना तुम्हाला आहे ना आम्हाला आहे. आता आपण विनोबाजींच्या भाषेत म्हणायला हवे. जय जगत!

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

### मागच्या जन्मी पाप केले तो नगरसेवक होतो....

# महापाप करणारा महापौर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. नागपूर येथे एका मुलाखतीत त्यांना त्यांच्या नगरसेवकाच्या काळातला किस्सा विचारण्यात आला.
यावर फडणवीसांनी एक मजेशीर किस्सा सांगितला. तसेच महापौर आणि नगरसेवकाचा जॉब एकदम टफ असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ज्याने मागच्या जन्मी पाप केले तो नगरसेवक होतो आणि ज्याने महापाप केले तो महापौर होतो, असेही फडणवीस यांनी गंमतीने विधान केले.
देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी २१ व्या वर्षी नगरसेवक झालो. त्या दिवशी रात्री उशिरापर्यंत मिरवणुका वगैरे काढल्या आणि पहाटे ४ वाजता मी आमच्या घराच्या हॉलमध्ये झोपलो. आणि सकाळी ७ वाजताच घराची बेल वाजली. मी दरवाजा उघडला आणि समोर एक गृहस्थ उभे होते. मी त्यांना विचारले इतक्या सकाळी सकाळी कसेकाय? त्यावर म्हणाले, माझे गटार चोक झाले आहे म्हणून तक्रार करण्यासाठी तुमच्याकडे आलो. त्या दिवशी आपण काय स्वीकारले आहे हे मला समजले.
पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी गमतीने म्हणतो की, ज्याने मागच्या जन्मी पाप केले तो नगरसेवक होतो आणि ज्याने महापाप केले तो महापौर होतो. पण मला असे वाटते की तेव्हाच्या महानगरपालिकेत आणि आताच्या महानगरपालिकेत खूप फरक पडला आहे.
तेव्हा नागपूर शहर विकासाची आस बघत होते. मी महापौर झालो तेव्हा नागपूरमध्ये पाण्याच्या आठ टाक्या होत्या, आज १०८ पाण्याच्या टाक्या आहेत. हा नागपूरमधला बदल आहे. आज नागपूर एक आधुनिक शहर म्हणून बघायला मिळत आहे.




आमचा तो काळ होता जेव्हा नगरसेवक फक्त गटर, रस्ता आणि दिवे याचा विचार करायचा. तेव्हा अक्षरशः स्पर्धा लागायची की जो स्टोअर किपर असायचा, ज्याच्याकडे ते सगळे दिवे ठेवलेले असायचे, त्याला पटवून तो दिवा लावण्याचे एक दिव्य होते. आता या सगळ्या गोष्टी कराव्या लागत नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.
तेव्हाच्या निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या नसत्या तर देवेंद्र फडणवीस नगरसेवक झाले नसते, यावर बोलताना त्यांनी सांगितले की, हे खरे आहे. मला ज्यावेळी सांगितले की या वॉर्डमधून लढायचे आहे. त्यावेळी मी कोणाला सांगितले नाही की माझे वय झाले नव्हते, माझे वय पूर्ण व्हायचे बाकी होते. पण तेव्हा ती निवडणूक काही कारणांमुळे पुढे ढकलली गेली आणि माझे वय त्या निवडणुकीसाठी भरले, असा किस्सा देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितला.

### डॉ. माधव गाडगीळ यांनी घेतला

# अखेरचा श्वास

## पर्यावरणाचा प्रखर प्रहरी हरपला

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :



भारताचे ज्येष्ठ पर्यावरणशास्त्रज्ञ, नामवंत विचारवंत आणि निसर्गसंवर्धनासाठी आयुष्य वाहून घेणारे डॉ. माधव गाडगीळ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. वयाच्या ८३ व्या वर्षी पुण्यातील डॉ. शिरीष प्रयाग हॉस्पिटलमध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला.
त्यांच्या जाण्याने देशाने पर्यावरण, जैवविविधता आणि शाश्वत विकासासाठी निर्भीडपणे भूमिका मांडणारा एक अभ्यासू आणि संवेदनशील शास्त्रज्ञ गमावला आहे. पर्यावरणीय प्रश्नांवर वैज्ञानिक दृष्टीकोनासोबत सामाजिक जाणिवा जोडणारा हा आवाज कायमचा शांत झाला आहे.
डॉ. माधव गाडगीळ हे भारतीय पर्यावरण चळवळीतील एक अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्त्व होते. विशेषतः पश्चिम घाटातील जैवविविधता, निसर्गसंपत्तीचे संवर्धन आणि अनियंत्रित विकासामुळे होणारे नुकसान या विषयांवर त्यांनी सातत्याने लक्ष वेधले. पश्चिम घाट संवर्धनासाठी स्थापन झालेल्या ह्यपश्चिम घाट पर्यावरण तज्ज्ञ पॅनेलह्चे अध्यक्ष म्हणून त्यांनी सादर केलेला गाडगीळ समितीचा अहवाल हा त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड मानला जातो. या अहवालामुळे विकास विरुद्ध पर्यावरण या मुद्द्यावर देशभरात तीव्र चर्चा सुरू झाली होती.
पर्यावरण संरक्षण आणि विकास यामध्ये समतोल राखण्याची भूमिका डॉ. गाडगीळ यांनी आयुष्यभर मांडली. जंगल, नद्या, डोंगररांगा आणि मानवी समाज यांचा परस्पर संबंध अधोरेखित करत त्यांनी शाश्वत विकासाची संकल्पना पुढे नेली.
शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातही डॉ. माधव गाडगीळ यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांनी भारतीय विज्ञान संस्था (क्क्र्) येथे प्राध्यापक म्हणून कार्य करत लोकसंख्या जीवशास्त्र, मानवी पर्यावरणशास्त्र, संवर्धन जीवशास्त्र आणि नैसर्गिक संसाधनांच्या शाश्वत व्यवस्थापन या क्षेत्रांमध्ये मूलभूत संशोधन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी आणि संशोधक घडले, जे आज देश-विदेशात पर्यावरण अभ्यासाच्या क्षेत्रात कार्यरत आहेत.

### मुख्य प्रतोद आणि प्रतोदांना

## मंत्री दर्जा देण्याचा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :
राज्य विधानमंडळातील कामकाजात शिस्त आणि समन्वय राखण्यासाठी राज्य सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सत्ताधारी आणि किमान १० टक्के सदस्यसंख्या असलेल्या विरोधी पक्षांच्या मुख्य प्रतोदांना मंत्रिपदाचा आणि प्रतोदांना राज्यमंत्री पदाचा राजशिष्टाचारापुरता दर्जा देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयामुळे आता सभागृहातील प्रतोदांचे राजकीय वजन आणि सुविधांमध्ये वाढ होणार आहे.
शासनाने स्पष्ट केले आहे की, हा दर्जा केवळ राजशिष्टाचारापुरता मर्यादित असेल. मंत्री किंवा राज्यमंत्र्यांना मिळणारे नियमित वेतन, भत्ते किंवा इतर प्रशासकीय सुविधा या पदाधिकाऱ्यांना लागू नसतील. तथापि, त्यांच्या जबाबदाऱ्यांचा विचार करून त्यांना ठराविक मानधन आणि सोयी-सुविधा पुरवल्या जाणार आहेत.

## जनगणनेचा पहिला टप्पा एप्रिल ते सप्टेंबर दरम्यान

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :
केंद्रीय गृह मंत्रालयाने सांगितले की, देशात होणाऱ्या २०२७ च्या जनगणनेचा पहिला टप्पा १ एप्रिल ते ३० सप्टेंबर दरम्यान पार पडेल. याची सुरुवात घरांची यादी तयार करणे आणि घरांचा डेटा गोळा करण्यापासून होईल. प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेश त्यांच्या येथे ३० दिवसांत हे काम पूर्ण करतील.
१ एप्रिलपासून देशभरातील सर्व घरे आणि कुटुंबांची यादी तयार केली जाईल. तसेच, कुटुंबांची इतर माहिती देखील गोळा केली जाईल, जेणेकरून लोकसंख्या मोजण्याची मजबूत तयारी करता येईल, असेही केंद्रीय गृह मंत्रालयाने सांगितले.

## शिंदे, राऊत समोरासमोर



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :
मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराचा जोर शिगेला पोहोचलेला असतानाच, गुरुवारी एक अनपेक्षित घडामोड घडली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे एकाच ठिकाणी समोरासमोर आले आणि त्यांनी एकमेकांशी थेट संवाद साधला.
राजकीयदृष्ट्या एकमेकांचे कट्टर विरोधक मानले जाणारे हे दोन्ही नेते सौहार्दपूर्ण वातावरणात भेटल्यामुळे, निवडणूक काळात या प्रसंगाने अनेकांच्या भुवया उंचावल्या असून, या भेटीचा फोटो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. मुंबईतील एका हिंदी वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमादरम्यान ही भेट घडली. या दोन्ही नेत्यांमध्ये काही काळ संवादही झाला.




# व्रतस्थ पर्यावरण शास्त्रज्ञाला मुकलो..

■ महासागर प्रतिनिधी,नागपूर, दि. ८ :

### मुख्यमंत्र्यांची श्रद्धांजली

पर्यावरण संतुलनाच्या क्षेत्रासाठी आयुष्य वेचणारे डॉ. माधव गाडगीळ व्रतस्थ पर्यावरण शास्त्रज्ञ म्हणून सदैव स्मरणात राहतील, अशी शोकभावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पद्मभूषण डॉ माधव गाडगीळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.
मुख्यमंत्री शोकसंदेशात म्हणतात, डॉ गाडगीळ यांनी पर्यावरणविषयक जाणिव जागृती व्हावी यासाठी विशेष प्रयत्न केले.
पश्चिम घाटांमधील जैवविविधतेबाबतच्या संवेदना जिवंत ठेवणं आणि त्या प्रगल्भ करणे यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. डॉ गाडगीळ यांच्या योगदानाची दखल घेऊन संयुक्त राष्ट्र संघाने त्यांना २०२४ मध्ये यूएनईपीच्या चॅम्पियन ऑफ द अर्थ पुरस्काराने सन्मानित केले होते.
सहा दशकांच्या वैज्ञानिक कारकिर्दीत त्यांनी अनेक पदे भूषविली. मात्र त्यांनी स्वतला जनतेचा वैज्ञानिकच मानलं. पर्यावरण क्षेत्रातील कार्याने महाराष्ट्र सुपुत्र डॉ. गाडगीळ यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण केली. या अर्थाने त्यांची पर्यावरण जतन, संवर्धन क्षेत्राला उणीव भासत राहील. त्यांच्या निधनामुळे एका ऋषीतुल्य मार्गदर्शकाला आपण मुकलो असून गाडगीळ कुटुंबीयांवर दुःखाचा आघात झाला आहे. त्यांच्यासह गाडगीळ यांचे चाहते, त्यांचे संशोधक विद्यार्थी यांच्या दुःखात आम्ही सहभागी असून, ईश्वराने त्यांना हा आघात सहन करण्याची ताकद द्यावी अशी प्रार्थना करतो आणि ज्येष्ठ पर्यावरण शास्त्रज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

### अभ्यासू विचारवंत हरपले

पर्यावरण संरक्षणासाठी निर्भीडपणे भूमिका मांडणारे, अभ्यासू आणि दूरदृष्टी असलेले विचारवंत आपण गमावले आहेत, अशा शब्दांत विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या निधनाबद्दल तीव्र शोकभावना व्यक्त केली आहे.
पर्यावरणविषयक जाणिवा आणि विशेषतः पश्चिम घाटातील जैवविविधतेबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणारे नेतृत्व आज हरपले. जैवविविधतेच्या संरक्षणासाठी डॉ. माधव गाडगीळ यांनी सामाजिक आणि पर्यावरणीय जाणीवांना अमूल्य असे योगदान दिले. पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास आणि निसर्गसंपत्तीच्या संवर्धनासाठी त्यांनी आयुष्यभर अथक प्रयत्न केल्याचे बन्सोडे म्हणाले.

## 'त्या' उमेदवारांना न्यायालयाचा दिलासा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :
पुढील आठवड्यात होणाऱ्या मुंबई महापालिका निवडणुकीसाठी अर्ज फेटाळल्या गेलेल्या इच्छुक उमेदवारांना आता उच्च न्यायालयाकडून संधी मिळण्याची शक्यता आहे.
विविध कारणांमुळे बाद ठरवण्यात आलेले अर्ज पुन्हा स्वीकारले जावेत, या मागणीसाठी उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल करण्यात आली असून, प्रकरणाचे गांभीर्य ओळखून न्यायालयाने यावर शुक्रवारी तातडीने सुनावणी घेण्याचे निश्चित केले.
मुंबई महापालिका निवडणुकीच्या विभाग क्रमांक १ ते २२७ च्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आणि आयुक्तांनी उमेदवारांचे अर्ज फेटाळल्याच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे.

# अंबरनाथमध्ये ऑपरेशन लोटस यशस्वी

## फडणवीसांच्या आदेशानंतर अभद्र युती तुटली, पण काँग्रेसच्या १२ नगरसेवकांचा भाजपमध्ये प्रवेश




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**

अंबरनाथ नगपरिषदेसाठी भाजप आणि काँग्रेसची युती झाली. त्यामुळे राजकीय वतुळांत खळबळ माजली. ठाकरेंपासून शिंदेपर्यंत साऱ्यांनी भाजपवर आरोप केले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही अभद्र युती तोडण्याचे आदेश दिले. आता या राजकीय नाट्याचा दुसरा प्रसंग रंगला असून, काँग्रेसच्या १२ नगरसेवकांना आता भाजपने प्रवेश दिलाय. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि ज्येष्ठ नेते गणेश नाईक यांच्या उपस्थितीत नवी मुंबईत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

अंबरनाथमध्ये काँग्रेसचे नेतृत्व करणारे प्रदीप नाना पाटील आणि त्यांच्यासह इतर ११ नगरसेवकांनी भाजपला पाठिंबा देण्याचे संकेत दिले होते. याची गंभीर दखल घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार वरिष्ठ उपाध्यक्ष गणेश पाटील यांनी या सर्व नगरसेवकांना पक्षातून निलंबित केले होते. मात्र, काँग्रेसच्या या कारवाईला जुमानता प्रदीप पाटील यांनी आपल्या सर्व सहकाऱ्यांसह भाजपमध्ये प्रवेश करून काँग्रेसला मोठा धक्का दिला.

भाजपमध्ये प्रवेश केलेल्या नगरसेवकांमध्ये प्रदीप नाना पाटील, दर्शना उमेश पाटील, अर्चना चरण पाटील, हर्षदा पंकज पाटील, तेजस्विनी मिलिंद पाटील, विपुल प्रदीप पाटील, मनीष म्हात्रे, धनलक्ष्मी जयशंकर, संजीवनी राहुल देवडे, दिनेश गायकवाड, किरण बद्रीनाथ राठोड, कबीर नरेश गायकवाड यांचा समावेश आहे.

प्रदीप पाटील यांनी अनेक वर्षांपासून अंबरनाथमध्ये काँग्रेसचे संघटन मजबूत ठेवले होते. मात्र, त्यांच्या भाजप प्रवेशामुळे अंबरनाथ नगरपरिषदेत भाजपची ताकद प्रचंड वाढली असून, काँग्रेसचे अस्तित्व संकटात आले आहे. दुसरीकडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'काँग्रेससोबत युती करणार नाही' असे स्पष्ट केले होते, मात्र नगरसेवकांनीच भाजपमध्ये प्रवेश केल्याने तांत्रिकदृष्ट्या हा प्रश्न आता संपुष्टात आला आहे.

या घडामोडींवर काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी भाजपवर जोरदार टीका केली आहे."जर काँग्रेसने आपल्या नगरसेवकांवर शिस्तभंगाची कारवाई केली, तर ज्या भाजप नेत्यांनी या नगरसेवकांना आघाडीचा प्रस्ताव दिला, त्यांच्यावर भाजपने अद्याप कारवाई का केली नाही?" असा सवाल सचिन सावंत यांनी केला आहे.

सचिन सावंत यांनी अकोटमधील भाजप-एमआयएम युतीचा दाखला देत भाजपच्या नीतिमत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "अकोटमध्ये भाजपने सत्तेसाठी एमआयएमशी हातमिळवणी केली. यावरून स्वातंत्र्यपूर्व काळातील हिंदू महासभा आणि मुस्लिम लीगच्या युतीची आठवण होते. भाजप आणि एमआयएम पडद्याआड एकच आहेत, हे आता उघड झाले आहे. सत्तेसाठी तत्त्वे आणि विचार बाजूला ठेवणारा हा पक्ष आहे," अशी टीका त्यांनी केली. 'अंबरनाथमध्ये झालेल्या भाजप-काँग्रेस आघाडीबद्दल आम्ही भाजप प्रदेशाध्यक्ष, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोललो होतो. तिथे पाहा काय होतंय ते. जे होतंय, ते विचारसरणेशी सुसुंगत नाही, याची जाण करून दिली होती. हा एकनाथ शिंदे खुचीर्साठी लढत नाही. सत्ता मिळवण्यासाठी विचारधारेशी तडजोड करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही,' असे म्हणत शिवसेनेचे एकनाथ शिंदे यांनी भाजपला घरचा आहेर तर दिलाच, सोबत आरसाही दाखवला. एकनाथ शिंदे यांनी आजतक वृत्तवाहिनीला मुलाखत दिली.

## आरोप सिद्ध झाले तर राजकारणातून संन्यास घेईन



■ **पुणे :** पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत राजकीय आरोप-प्रत्यारोपांनी टोक गाठले आहे. कुख्यात गुंड नीलेश घायवाळ प्रकरणातील गुन्हेगारांना परदेशात पळून जाण्यासाठी मदत केल्याचा गंभीर आरोप भाजप नेते आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर करण्यात आला होता. अजित पवारांनी देखील मोहोळ यांच्यावर या संदर्भात टीका करत आरोप केला होता. या आरोपांमुळे पुण्याच्या राजकीय वतुळांत मोठी खळबळ उडाली असून, आता स्वतः मुरलीधर मोहोळ यांनी यावर आक्रमक पवित्रा घेतला आहे. माज्यावर झालेले आरोप सिद्ध करून दाखवा, जर ते सिद्ध झाले तर मी आजच राजकारणातून संन्यास घेईन, असे थेट आव्हान मोहोळ यांनी दिले आहे. पुण्यातील गुन्हेगारी आणि टोळीयुद्ध हा नेहमीच चचेर्चा विषय राहिला आहे. नीलेश घायवाळ या कुख्यात गुंडाशी संबंधित काही गुन्हेगारांवर पोलिसांची कारवाई सुरू असताना, त्यांना देशाबाहेर पळून जाण्यासाठी मुरलीधर मोहोळ यांनी रसद पुरवली आणि राजकीय दबावाचा वापर करून मदत केली, असा खळबळजनक आरोप विरोधकांकडून करण्यात आला होता. गुन्हेगारांना कायदेशीर कचाट्यातून वाचवण्यासाठी मोहोळ यांनी आपले वजन वापरले आणि त्यांना विदेशात सुरक्षित स्थळी धाडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, असे या आरोपांचे स्वरूप आहे. निवडणुकीच्या काळात हा मुद्दा समोर आल्याने मोहोळ यांच्या प्रतिमेला धक्का लावण्याचा प्रयत्न विरोधकांकडून केला जात आहे.

## महाराष्ट्रात नंबर वन मत मिळतील



महापालिकेच्या रणधुमाळीत चंद्रकांत पाटलांचा दावा

■ **पुणे :** पुणे महानगरपालिका निवडणुका सध्या केवळ स्थानिक राजकारणापुरत्या मर्यादित न राहता संपूर्ण राज्याच्या राजकीय चचेर्चा केंद्रबिंदू ठरत आहेत. उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी घडलेल्या घडामोडींमुळे पुण्यातील निवडणूक वातावरण अधिकच तापले आहे. भाजपकडून अमोल बालवडकर यांना उमेदवारी नाकारण्यात आल्यानंतर त्यांनी थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत उमेदवारी मिळवली. या घटनेमुळे भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील राजकीय संघर्ष अधिक तीव्र झाला असून, बालेवाडी परिसरातील ही लढत राज्यभर चचेर्चा विषय बनली आहे. भाजपने अमोल बालवडकर यांना डावलत त्याठिकाणी लहू बालवडकर यांना उमेदवारी दिल्याने राजकीय समीकरणे बदलली. एका बाजूला भाजपचा अधिकृत उमेदवार, तर दुसऱ्या बाजूला भाजपमधून बाहेर पडून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेला माजी इच्छुक उमेदवार, अशी थेट लढत पाहायला मिळत आहे.

## सचिन खरातांची निवडणुकीतून माघार



■ **पुणे :** पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांना मोठा राजकीय धक्का बसला आहे. पुण्यात गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांना तिकीट दिल्यावरून सुरू असलेल्या वादात अजित पवारांनी ज्यांच्याकडे बोट दाखवले होते, त्या सचिन खरात यांनीच आता निवडणुकीतून तडकाफडकी माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे.

पुणे महानगरपालिका निवडणुकीत 'गुन्हेगारी' आणि 'राजकारण' यावरून सुरू असलेल्या वादात आता नवीन वळण आले आहे. ज्या उमेदवारांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे अजित पवारांवर टीका होत होती, ते उमेदवार आपले नसून मित्रपक्ष असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात गटाचे असल्याचे अजित पवारांनी स्पष्ट केले होते. मात्र, आता सचिन खरात यांनीच या निवडणूक प्रक्रियेतून बाहेर पडण्याची घोषणा केल्याने अजित पवारांची मोठी अडचण झाली आहे. सचिन खरात यांनी पुणे महापालिका निवडणुकीतून माघार घेताना अजित पवार गटावर गंभीर आरोप केले आहेत. "मी सन्मानपूर्वक जागा मिळाव्यात या अपेक्षेने अजित पवारांसोबत गेलो होतो. मात्र, तशा जागा आम्हाला मिळाल्या नाहीत. त्यामुळे मी आणि माझा पक्ष या निवडणूक प्रक्रियेतून पूर्णपणे बाहेर पडत आहोत. आता कोणत्याही प्रभागात आमच्या पक्षाचा कोणत्याही उमेदवाराला पाठिंबा नसेल," असे सचिन खरात यांनी जाहीर केले आहे.

## शिर्डीहून परतताना दोन कारचा अपघात

# चार जागीच ठार



■ **महासागर प्रतिनिधी नाशिक, दि. ८ :**

शिडीर्हून नाशिकमार्गे गुजरातकडे जाताना नाशिक- पेठ रस्त्यावर चाचडगाव टोल नाक्यापुढे आंबेगण शिवारात दोन कारच्या अपघातात एका महिलेसह चार ठार झाले. आठ जखमी असून यातील चार महिला गंभीर असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. बुधवारी (दि.७) दुपारी ३ वाजता हा अपघात झाला. मृत राजस्थान तसेच गुजरातच्या सिल्वासामधील असून त्यातील दोघांची ओळख पटली आहे. नाशिककडून पेठकडे जाणारी स्कॉर्पिओ (जी. जे. १५, सी.आर.७९६४) ओव्हरटेक करत असताना तिने पेठकडून नाशिककडे येणाऱ्या कारला (डी.डी. ०१, ए.ए.९०१३) धडक दिली. यात स्कॉर्पिओतील छोगालाल हिरालाल गुर्जर (वय ७५, रा.देवगड, राजसमंद, राजस्थान) तर दुसऱ्या कारचा चालक शाहरुख खान फराकत (वय २८, रा. सिल्वासा) याच्यासह अन्य एक महिला व एका प्रवाशासह ४ जागीच ठार झाले. दोन्ही वाहनांचे पत्रे कापून जखमी आणि मृतांना बाहेर काढण्यात आले.

शिर्डी येथून दर्शन करुन वापीकडे कारने जात होतो. चालक व्यवस्थित कार चालवत होता. अचानक समोरुन येणाऱ्या कारला धडक दिल्याने मोठा आवाज झाला. तोंडाला- हाताला गंभीर जखमा झाल्या आहेत. कोण कुठे आहे मला काहीच माहिती नाही. ते ठिक आहे का प्लीज मला सांगा.

# अजित पवारांच्या सभेपूर्वीच पोलिसांचा मोठा दणका

## एनसीपी उमेदवारासह ८ जण सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातून हद्दपार

■ **वृत्तसंस्था, सांगली, दि. ८ :**

सांगली महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत पोलिस दलाने गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी कडक पावले उचलली असून, यात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाला मोठा झटका बसला आहे. प्रभाग क्रमांक ६ मधील राष्ट्रवादीचे अधिकृत उमेदवार आझम काझी यांच्यासह त्यांच्या टोळीतील एकूण आठ जणांवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, उद्या ९ जानेवारी रोजी मिरजेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जाहीर सभा होणार असतानाच ही कारवाई झाल्याने राजकीय गोटात मोठी खळबळ उडाली आहे.

पोलिस अधीक्षक संदीप घुगे यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ही धडक कारवाई केली आहे.

टोळीप्रमुख शोएब ऊर्फ मोहमद युसूफ साहेबपीर चमनमलीक काझी, मतीन काझी, अक्रम काझी, रमेश कुंजीरे, अस्लम काझी, उमेदवार आझम काझी, अल्ताफ रोहीले आणि मोहसिन गोदड या आठ जणांना सांगली आणि कोल्हापूर या दोन जिल्ह्यांतून एक वर्षासाठी तडीपार करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांच्या मुद्द्यावरून भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये एकमेकांवर जोरदार टीकास्त्र डागले जात होते, त्या पार्श्वभूमीवर ही कारवाई अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

केवळ मिरजच नव्हे, तर कुपवाड, विटा आणि आटपाडी भागातही पोलिसांनी गुन्हेगारांना कडक दणका दिला आहे. कुपवाड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सुरज ऊर्फ रमजान मौला शेख, शब्बीर शेख, सौरभ जावीर आणि अर्जुन गेजगे या चौघांना सहा महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार केले आहे. विटा येथील राजाराम बोडरे आणि सुदाम बोडरे यांच्यावरही सहा महिन्यांची हद्दपारी लादली आहे. आटपाडी येथील जितेंद्र ऊर्फ जिच्या काळे आणि त्याच्या टोळीला सांगली, सोलापूर आणि सातारा अशा तीन जिल्ह्यांतून दोन वर्षांसाठी बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे.

## ज्येष्ठ नेते सुधीर काळेंचा भाजपमध्ये प्रवेश



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ८ :**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि पीएमपीएमएलचे माजी अध्यक्ष सुधीर काळे यांनी आज पुण्यात भाजपमध्ये प्रवेश केला. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर हा प्रवेश झाल्याने राजकीय वतुळांत चर्चांना उधाण आले आहे.

यावेळी बोलताना केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की, सुधीर काळे यांचा भाजपमध्ये उशिराने प्रवेश झाला असला तरी, ते पक्षात यावे अशी आमची इच्छा होती. निवडणुकीला अवघा एक आठवडा शिल्लक असताना कोणतीही अपेक्षा न ठेवता त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याचा आम्हाला अभिमान आहे. काळे यांची सर्वसमावेशक काम करणारा नेता अशी प्रतिमा आहे.

## १५ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ८ :**

राज्यातील २९ महानगर पालिकांच्या निवडणुकीसाठी गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित मतदान क्षेत्रात सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याची अधिसूचना राज्य शासनाने प्रसिद्ध केली आहे.

अधिसूचना सर्व विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, इत्यादींच्या निदर्शनास आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महानगरपालिका क्षेत्रांतील केंद्रशासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका व तत्सम आस्थापनांनाही ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## सिंह-वाघांचा वारसा, लांडग्यांकडे लक्ष नाही



महेश लांडगेंच्या टीकेवर मिटकरींचा पलटवार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**

महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारण अधिकच तापत चालले असून, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील वाकयुद्ध आता वैयक्तिक आरोप-प्रत्यारोपांच्या पातळीवर पोहोचले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार सातत्याने भाजपवर, विशेषतः पुण्यातील भाजप नेत्यांवर जोरदार टीका करताना दिसत आहेत. त्याला प्रत्युत्तर म्हणून भाजप नेतेही आक्रमक भूमिका घेत असून, या संघषार्मुळे निवडणुकीच्या रणधुमाळीत वातावरण अधिकच तणावपूर्ण बनले आहे.

पिंपरीतील भाजप आमदार महेश लांडगे यांनी केलेली टीका या वादाला नवी धार देणारी ठरली. अजित पवार हे महाराष्ट्राचे आणि पुण्याचे आका असल्याचा आरोप करत, त्यांनी अजित पवारांवर थेट भ्रष्टाचार लपवण्यासाठी भाजपमध्ये प्रवेश केल्याचा आरोप केला. एक तर स्वतःचा भ्रष्टाचार झाकण्यासाठी भाजपमध्ये आलात, त्याआधी स्वतःच्या लेकाचे पराक्रम पाहा. मुळात तुम्ही स्वतःच आका आहात, हे जाहीर करा, अशा शब्दांत लांडगे यांनी अजित पवारांवर हल्लाबोल केला होता.

या आरोपांवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मात्र नेहमीप्रमाणे संयमित प्रतिक्रिया देत विषय एका वाक्यात आटोपण्याचा प्रयत्न केला. मी कोण आहे हे जनता ठरवेल. 15 तारखेपर्यंत कळ काढा, त्यानंतर उत्तर देतो, असे म्हणत त्यांनी थेट वादात न पडता अप्रत्यक्षपणे जनतेच्या निकालावर विश्वास व्यक्त केला.

## रिल्स स्टार अथर्व सुदामेला दंड

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ८ :**

सोशल मीडियावर आपल्या विनोदी रिल्सने लाखो चाहत्यांची मने जिंकणारा रिल्स स्टार अथर्व सुदामे आता एका कायदेशीर फेऱ्यात अडकला आहे. पुणे महानगर परिवहन महामंडळाने अथर्वला दोन रिल्सप्रकरणी ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला असून, त्याला तिसरी आणि अंतिम नोटीस बजावली आहे. वारंवार दिलेल्या नोटिसींना प्रतिसाद न दिल्याने पीएमपी प्रशासनाने आता आक्रमक पवित्रा घेतला आहे.

## छत्रपती संभाजीनगरात खड्डेमुक्त रस्ते होणार

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे आश्वासन



■ **वृत्तसंस्था, छत्रपती संभाजीनगर, दि. ८ :**

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी प्रचार सुरू केला आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर आले असता त्यांच्याशी पत्रकारांनी संवाद साधला. यात त्यांनी संभाजीनगरच्या विकासासाठी करण्यात आलेल्या योजना तसेच निधींच्या तरतुदीबद्दल माहिती दिली. तसेच शहराच्या विकासाचे नवे व्हीजनही मांडले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, डीएमआयसीमध्ये देखील आपल्याला अधिकची जागा लागणार आहे. दोन एमआयडीसीला जोडण्याचे काम हाती घेतले आहे. 2015 साली छत्रपती संभाजीनगरच्या रस्त्यांसाठी 100 कोटी दिले होते आणि तेव्हापासून रस्ते आपल्याला मोठे करता येतात ही भावना तयार झाली. आता मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण काढण्याची मोहीम सुरू झाली आहे. शहरातील सगळे डीपी रोड अतिक्रमणमुक्त करणार असल्याचा अजेंडा असणार आहे. तसेच खड्डेमुक्त संभाजीनगर आपल्याला पाहायला मिळेल.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, पहिल्यांदा तर आपल्या सगळ्यांसाठी एक गुड न्यूज आहे की आज आपण पाण्याच्या योजनेच्या पंपाची चाचणी यशस्वी केली आहे. इथला जो पाण्याचा प्रश्न होता, मागच्यावेळी मी मुख्यमंत्री होतो तेव्हा आपण एका झटक्यात 1600 कोटींची योजना आपण मंजूर केली होती. तसेच अनुदानावर ही योजना सुरू करण्यात आली. त्यानंतर उद्धव ठाकरेंची सत्ता आल्यानंतर या योजनेचा खोळंबा झाला. आता ही योजना 2700 कोटींची झाली असून पुढील 2 महिन्यात पाण्याचा प्रश्न सुटेल.

औद्योगिक विकासासोबत आपल्याला अर्बन इनफ्रास्ट्रक्चर देखील सुरू विकसित करावे लागणार आहे. 2014 साली मोदीजी जेव्हा सत्तेवर आले तेव्हा शहराचच्या विकासावर काम करण्यास सुरू केले. संभाजीनगर सारख्या शहराला पूर्वी निधी मिळत नव्हता, आता शहरांच्या विकासासाठी निधी पुरवठा केला जात आहे. तसेच जोपर्यंत शहराचा आर्थिक विकास होत नाही, तोपर्यंत अर्बन इनफ्रास्ट्रक्चर कोपअप होत नाही. या औद्योगीक विकासामुळे संपूर्ण शहराचा विकास होणार आहे, असे आश्वासन देखील देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

उद्योजकासंदर्भात बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की उद्योजक संभाजीनगरच्या प्रेमात पडतात. आता दावोसमधून संभाजीनगरसाठी आणखी निधी आणणार असल्याचे देखील यावेळी त्यांनी आश्वासन दिले आहे. इतकेच नव्हे तर एआयबाबतचे जागतिक सतरावरील काम संभाजीनगरातून होत असल्याची देखील माहिती फडणवीस यांनी दिली आहे.

समृद्धी महामागार्सारखा महामार्ग असावा अशी कल्पना कधी आली? असा प्रश्न विचारण्यात आला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, याची कल्पना मी 2001 साली महाराष्ट्राच्या विधानसभेत मांडली होती. नागपूर ते मुंबई असा महामार्ग तयार करण्यात यावा, अशी माझी कल्पना होती. त्याकाळी मी कम्युनिकेशन सुपर एक्सप्रेसवे म्हटले होते, तेव्हा आयटीचा कल होता. परंतु, तेव्हा ते झाले नाही. पण जेव्हा मी 2014 ला मुख्यमंत्री बनलो आणि या महामागार्चे काम सुरू करण्याचे ठरवले. नागपूर ते मुंबई अशी मी सरळ रेष मारली आणि असा रोड आपल्याला हवा आहे, असे मी अधिकाऱ्यांना सांगितले. त्यावेळी विरोधकांनी शेतकऱ्यांना सांगितले की या महामागार्साठी एक इंच जागा देऊ नका, पण मी यावर मात करत हा रस्ता पूर्ण केला.

## समृद्धी महामार्गावर पाच दिवस वाहतूक ब्लॉक



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ८ :**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्गावर ९ ते १३ जानेवारीदरम्यान अमरावती येथील धामणगाव (ता. चांदूर) आणि नांदगाव खांडेश्वर येथे वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) समृद्धी महामार्गावर हायवे ट्राफिक मॅनेजमेन्ट सिस्टमअंतर्गत गॅन्ट्री उभारण्याचे काम सुरु आहे. या कामासाठी दहा टप्प्यात ९ ते १३ जानेवारीदरम्यान वाहतूक ब्लॉक घेण्यात आला असून ठराविक वेळेत ठराविक ठिकाणची वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे.

समृद्धी महामार्गावरील अमरावती जिल्ह्यातील धामणगाव आणि नांदगाव खांडेश्वर येथील वाहतूक १० टप्प्यात बंद असणार आहे. चांदूर रेल्वे येथील मांजरखेड गावातील समृद्धी महामार्गावरील साखळी क्रमांक १२०.३००, चांदूर रेल्वे येथील धोत्रा गावातील साखळी क्रमांक १२५.४०० येथील मुंबई वाहिनीवरील वाहतूक ९ जानेवारीला दुपारी ३ ते दुपारी ४ वाजेपर्यंत पूर्णत बंद राहिल. चांदूर रेल्वे येथील मांजरखेड गावातील साखळी क्रमांक १२३.३०० वरील नागपूर वाहिनीवरील वाहतूक ९ जानेवारीला दुपारी १२ ते दुपारी १ वाजेपर्यंत बंद राहिल तर १० जानेवारील धामणगाव येथील वाढोना गावातील साखळी क्रमांक १०८.६०० वरील नागपूर वाहिनीवरील वाहतूक दुपारी ३ ते दुपारी ४ वाजेपर्यंत बंद असेल. चांदूर रेल्वे येथील खंबाळा गावातील साखळी क्रमांक १३०.४०० वरील मुंबई वाहिनीवरील वाहतूक दुपारी १२ ते दुपारी १ वाजेपर्यंत बंद राहिल.

१२ जानेवारीला चांदूर रेल्वे येथील शहापूर खेकडी गावातील साखळी क्रमांक १४५.२०० वरील नागपूर वाहिनीवरील वाहतूक दुपारी ३ ते दुपारी ४ दरम्यान बंद राहणार आहे. त्याच दिवशी नांदगाव खंडेश्वर येथील पाचोड गावातील साखळी क्रमांक १४०.५०० वरील नागपूर वाहिनीवरील वाहतूक दुपारी ३ ते दुपारी ४ वाजेपर्यंत बंद राहिल.

नांदगाव खंडेश्वर, देऊळगाव येथील साखळी क्रमांक १५०.३०० वरील मुंबई वाहिनीवरील वाहतूक १३ जानेवारीला दुपारी १२ ते दुपारी १ वाजेपर्यंत बंद राहणार आहे. त्याच दिवशी नांदगाव खंडेश्वर येथील शहापूर खेकडी गावातील साखळी क्रमांक १४५.२०० वरील मुंबई वाहिनीवरील वाहतूक दुपारी १२ ते दुपारी १ दरम्यान बंद राहणार आहे. १३ जानेवारीलाच नांदगाव खंडेश्वर येथील देऊळगाव येथील साखळी क्रमांक १५०.३०० वरील नागपूर वाहिनीवरील वाहतूक दुपारी ३ ते दुपारी ४ पर्यंत बंद राहील. प्रत्येक टप्प्यातील काम पूर्ण झाल्यानंतर वाहतूक सुरळीत होणार आहे.

## महिलेला लग्नाच्या बहाण्याने ३ लाखांत विकले

■ **महासागर प्रतिनिधी, पालघर, दि. ८ :**

पालघर जिल्ह्यात पोलिसांनी बुधवारी महिलेला लग्नाच्या बहाण्याने ३ लाखांना विकल्याच्या व छळाच्या आरोपावरून चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या महिलेने मे २०२४ मध्ये नाशिकमधील एका पुरूषाशी लग्न करण्यास भाग पाडल्याचा आरोप केला. एका पुरूषाने व त्याच्या आईने दोन मध्यस्थांना ३ लाख रुपये दिले होते. ज्यांनी नंतर तरुणीची तस्करी केली आणि तिचे लग्न लावून दिल्याचे अधिकाऱ्याने एफआयआरचा हवाला देत सांगितले.

तक्रारीत महिलेने सांगितले की, तिच्या पतीच्या कुटुंबाकडून तिचा शारीरिक आणि मानसिक छळ केला जात होता आणि तिला वारंवार शिवीगाळ केली जात होती. तिने आरोप केला की, तिचा पती मारहाण करुन गर्भवती असताना वेळेवर जेवण देत नव्हते. जून २०२५ मध्ये मुलाच्या जन्मानंतर महिला तिच्या आईच्या घरी परतली.

६ जानेवारी रोजी आरोपीने तिच्या मुलाला घेऊन जाण्याचा प्रयत्न केला तेव्हा हे प्रकरण उघडकीस आले. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता आणि अनुसूचित जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत वाडा पोलिस ठाण्यात महिलेचा पती, त्याची आई आणि दोन मध्यस्थांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पूर्वतयारी नरनाळा महोत्सवाची

# महोत्सवाच्या तयारीला वेग; समन्वयाने कामे करा

## जिल्हाधिकारी वर्षा मीना यांचे यंत्रणांना निर्देश

▪अकोला,दि.८ (प्रतिनिधी)▪

जिल्ह्यात नरनाळा महोत्सव दि. ३० जानेवारी ते दि. १ फेब्रुवारी दरम्यान होणार असून, महोत्सवाच्या यशस्वितेसाठी सर्व संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.महोत्सवाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने संबंधित यंत्रणांची बैठक जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या.पर्यटक, निसर्गमित्र व वनप्रेमींच्या जिव्हाळ्याचा विषय असलेला नरनाळा पर्यटन महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. नौकाविहार, सफारी, आदिवासी नृत्यकला सादरीकरण, पक्षीनिरीक्षण, गड भटकंती, साहसी खेळ, छायाचित्र प्रदर्शन याबरोबरच अनेकविध सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन केले जाणार आहे. महसूल, वनविभाग, पाटबंधारे विभाग यासह सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने महोत्सव यशस्वी करावा, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी यावेळी दिले. महोत्सवात वन्यजीवन माहितीपट, चित्रप्रदर्शन, साहसी खेळ, सफारी, मॅराथॉन आदी विविध बाबींचे अचूक नियोजन व्हावे. महोत्सवाचा कालावधी जवळ येत असून, आवश्यक कार्यवाही गतीने करावी, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले. उपवनसंरक्षक राहूल तोलिया, अकोटचे उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे व इतर अधिकारी, तसेच समिती सदस्य उपस्थित होते.




अण्णासाहेब पाटील आर्थकि मागास विकास महामंडळ

### व्याज परतावा कागदपत्रे देण्यासाठी १५ जानेवारीपर्यंत मुदत

▪अकोला,दि.८ (प्रतिनिधी)▪

अण्णासाहेब पाटील आर्थकि मागास विकास महामंडळातर्फे व्याज परताव्यासाठी कागदपत्रे अपलोड करण्यासाठी १५ जानेवारीपर्यंत मुदत देण्यात आली आहे.ज्या लाभार्थ्यांचे पात्रता प्रमाणपत्र १ जानेवारी २०२५ पूर्वी निर्माण केले आहे किंवा ज्या लाभार्थी यांना बँकेकडून बँक कर्ज मंजुरी प्राप्त झाले आहे. परंतू व्याज परताव्यासाठी महामंडळाच्या पोर्टल ववर उर्वरित कागदपत्रे घेऊन मंजूरी पत्र अपलोड करण्याची विशेष मुभा देण्यात येत आहे.तथापि, सदर सुविधा ही तात्पुरत्या स्वरूपाची असून सबब दि. १५ जानेवारीपूर्वी बँक मंजूरीसह सर्व योग्य कागदपत्रे लागेल.

# आ. सावरकरांना मिळाला मंत्रीपदाजा दर्जा

## मुख्यप्रतोद म्हणून मानधन, स्टाफही मिळणार

▪अकोला,दि.८ (प्रतिनिधी)▪

भाजपचे प्रदेश सरचिटणीस आणि अकोला पूर्वचे आ. रणधीर सावरकर याना भाजपचे विधी मंडळातील मुख्य प्रतोद म्हणून अधिवेशन काळात मंत्री पदाचा दर्जा आणि मानधन तसेच कर्मचारी वर्ग शुद्ध उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विधिमंडळातील राजकीय पक्षांचे मुख्य प्रतोद आणि प्रतोदांना राजशिष्टाचारापुरते मंत्री आणि राज्यमंत्रीपदाचा दर्जा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. बुधवारी संसदीय कार्य विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) जारी केला आहे. या प्रतोदांना मंत्रीपदाच्या सुविधा आणि भत्ते मिळणार नसले तरी यापुढे मुख्य प्रतोदांना आणि प्रतोदांना अनुक्रमे २५ हजार आणि २० हजार रुपयांचे मानधन देण्यात येणार आहे.



विधान मंडळाच्या विधानसभा तसेच विधानपरिषद या सभागृहात सत्ताधारी पक्षांचे प्रत्येकी एक मुख्य प्रतोद व एक प्रतोद तसेच सभागृहातील सदस्य संख्येच्या किमान दहा टक्के आमदार असणाया पक्षांच्या एक मुख्य प्रतोद व एक प्रतोद यांना सरकारकडून सुविधा मिळणार आहेत.मुख्य प्रतोद यांना फक्त राजशिष्टाचारापुरता मंत्रीपदाचा दर्जा राहील, तर तसेच प्रतोद यांनाही राजशिष्टाचारापुरता राज्यमंत्रीपदाचा दर्जा देण्यात येणार आहे. मात्र, दोन्ही मंत्री पदाला अनुसरून वेतन, भत्ते व अन्य कोणत्याही सुविधा देता येणार नाहीत. परंतु, मुख्य प्रतोद यांना प्रतिमाह २५ हजार तर प्रतोदांना २० हजार रुपयांचे मानधन विधानमंडळ सचिवालयातून देण्यात येणार आहे. तसेच, मुंबईतील अधिवेशनकाळात मुख्य प्रतोदाना २५ हजार रुपये तर प्रतोदांना २० हजार रुपयांचा वाहनभत्ता देण्यात येईल.

# ६ तासांत आंतरराज्यीय चेन स्नॅचिंग टोळीचा पर्दाफाश; ५ आरोपी जेरबंद

**अकोला :** डाबकी रोड पोलीस ठाण्याने अवघ्या ६ तासांच्या आत आंतरराज्यीय चेन स्नॅचिंग करणाऱ्या टोळीचा उलगडा करत मोठी कामगिरी बजावली आहे. या कारवाईत ५ आरोपींना अटक करून ५९ ग्रॅम सोन्याचे दागिने, वाहन व इतर साहित्य असा एकूण १६ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी गोकर्णी पार्क परिसरात फिर्यादी सौ. वंदना मोहन नागलकर (वय ६३) या घराशेजारी पाणी आले आहे का, असे विचारण्यासाठी जात असताना मागून आलेल्या मोटरसायकलवरील दोन अज्ञात इसमांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने ओढून पळ काढला.या प्रकरणी डाबकी रोड पोलीस ठाण्यात अप.क्र. ०३/२६ कलम ३०४(२), ३(५) इछड अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांनी तात्काळ तपासाचे आदेश दिले. डउ्झज श्री. सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. दिपक कोळी, सहा. पोलीस निरीक्षक अभिषेक अंधारे, गुन्हे शोध पथक व सायबर पथक सक्रिय करण्यात आले.तपासादरम्यान अकोला व लगतच्या जिल्ह्यांत अशाच प्रकारच्या चेन स्नॅचिंगच्या घटना झाल्याची माहिती समोर आली. आरोपी हे चोरीच्या मोटरसायकलवर गुन्हे करत असल्याचे तांत्रिक तपासात निष्पन्न झाले.

# माजी राज्यमंत्री गुलाबराव गावंडे यांना हृदयाघात

### नागपूर येथे उपचारासाठी दाखल

▪अकोला,दि.८ (प्रतिनिधी)▪

राष्ट्रवादी काँगेस श. प. चे जेंष्ठ प्रदेश नेते व माजी राज्यमंत्री गुलाबराव गावंडे यांना गुरुवारी हृदयघाताचा झटका आला.त्यांना प्रथम आयकॉन हॉस्पिटल येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले होते.तेथे डॉ आदित्य मापारी यांनी तपासणी करून तेथे प्राथमिक उपचार घेतल्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना वैद्यकीय शिफारसी नुसार नागपूरला तातडीने हलविण्यात आले आहे.गुरुवारी सकाळपासून गावंडे यांना अत्यवस्थ वाटत होते अश्यातच त्यांना हृदयघातचा झटका आला.म्हणून त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथील अर्नेजा हॉस्पिटल येथे हलविण्यात आले आहे.अशी माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली.



# प्रदीप कामले,डीआरएम नांदेड यांचा पूर्णा ते अकोला दरम्यान पाहणी दौरा पूर्ण

▪अकोला,दि.८ (प्रतिनिधी)▪

श्री. प्रदीप कामले, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नांदेड विभाग यांनी आज पूर्णा ते अकोला रेल्वे स्थानकांदरम्यान सविस्तर पाहणी करून सुरक्षितता, प्रवासी सुविधा व कार्यप्रणालीचा आढावा घेतला.या पाहणीदरम्यान पूर्णा, हिंगोली आणि वाशिम रेल्वे स्थानकांवर भेट देऊन प्रवासी सुविधा, स्वच्छता, सुरक्षितता व्यवस्था तसेच अमृत स्टेशन योजनेअंतर्गत सुरू असलेल्या विकासकामांची तपासणी करण्यात आली. सर्व कामे गुणवत्तापूर्ण व ठरलेल्या कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.तसेच पूर्णा–हिंगोली दरम्यानच्या लेव्हल क्रॉसिंग गेट क्रमांक १५५ ची पाहणी करून सुरक्षितता साधने व कार्यपद्धती तपासण्यात आली. रेल्वे व रस्ते वापरकर्त्यांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले.याशिवाय श्री कामले यांनी बसमत, हिंगोली, वाशिम आणि शिवणी शिवापूर येथील मालधक्का (गुड्स शेड) ची पाहणी करून माल चढउतार सुविधा, पायाभूत संरचना व सुरक्षितता व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. मालवाहतूक अधिक कार्यक्षम व सुरक्षित पद्धतीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या.दरम्यान, अकोला येथील रनिंग रूम व क्रू लॉबीचीही पाहणी करण्यात आली. लोको पायलट व गार्डसाठी उपलब्ध असलेल्या विश्रांती सुविधा, स्वच्छता व देखभाल यावर विशेष भर देत कर्मचाऱ्यांच्या सोयीसुविधा सुधारण्याच्या सूचना देण्यात आल्या.



# अकोल्याचे जवान वैभव लहाने यांना वीरमरण

▪अकोला,दि.८ (प्रतिनिधी)▪

देशसेवेत कर्तव्य बजावत असताना अकोला जिल्ह्यातील सेवारत सैनिक नायक वैभव श्रीकृष्ण लहाने यांना वीरमरण आले. ते १२ मराठा लाइट इन्फंट्री या युनिटमध्ये कार्यरत होते.शहिद लहाने हे जम्मू काश्मिरमध्ये कुपवाडा सेक्टरमध्ये कार्यरत होते. दि. ७ जानेवारी २०२६ रोजी ते शहीद झाले. त्यांचे मूळ गाव कपिलेश्वर (पो. वडद, ता. अकोला) असून, त्यांचे पार्थिव ९ जानेवारी रोजी दु. १ पर्यंत कपिलेश्वर येथे पोहोचेल. तिथे त्यांना मानवंदना देऊन अंतिम संस्कार केले जातील, अशी माहिती जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातर्फे देण्यात आली.



## थोडक्यात

### पु.सिताराम शास्त्री यांच्या भागवत कथेचे समापन

**अकोला :** –श्रीमद भागवत सेवा समिती व संत श्री राधे राधे महाराज भक्त परिवारच्या वतीने संत श्री राधे राधे महाराज यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त न्यू राधाकिसन प्लॉट परिसरातील माहेश्वरी भवन येथे दि २ डिसेंबर पासून सुरू असलेल्या प. पु.सिताराम शास्त्री यांच्या भागवत कथेची गुरुवारी मोठ्या भक्तीभावात सांगता झाली. भागवत कथेत सकाळी भागवत पूजन सोहळा होऊन यानंतर होमहवन संपन्न झाले.या नंतर पु सीताराम शास्त्री यांनी सुदामा मिलन कथा साकार करून कथा उत्सवाचे समापन केले. दरम्यान उत्सवात अँड मोतीसीह मोहता, विजय पनपालिया,विजय तोष्णीवाल,अँड जुगल शर्मा,गंगादेवी शर्मा, कार्तिक शर्मा,विजया शर्मा, वामनराव कडू,शशिकला बोरकर, डॉ सुनील बोरकर, गजानन नेरकर, प्रवीण आगरकर, कैलास शर्मा, कृष्णा शर्मा,अर्चना शर्मा,स्मिता कोरडे ,व्ही एल देशपांडे, श्रद्धा भिरड,न्युजर्सी अमेरिकाच्या माधवी तायडे समवेत अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती दर्शविली. यावेळी सर्व सदस्यांनी भोजन व्यवस्था पाहणारे नवल शर्मा यांचा सत्कार करण्यात आला.मुख्य यजमान प्रा.लक्ष्मीनारायण शर्मा,उमा शर्मा,दैनिक यजमान प्रवीण खंडेलवाल, संध्या खंडेलवाल,कृष्णमूमुरारी शर्मा इंदोर, वंदना शर्मा,राधा शर्मा, रीची शर्मा, राजेश शर्मा, वेदांत शर्मा यांनी पु शास्त्री यांचे शाल श्रीफळ देऊन पूजन केले.संचालन व आभार प्रा अनुप शर्मा यांनी केले.महाप्रसादने या उत्सवाची सांगता झाली. उत्सवाच्या सफलते साठी मुख्य यजमान प्रा. लक्ष्मीनारायण शओम प्रकाश कासट,हरिश मानधने, श्यामसुंदर मालपाणी,गोपाळराव जाधव, विनायकराव शेळके, प्रमोद मावळे,प्रवीण खंडेलवाल,ओम प्रकाश जाजू,कैलास अग्रवाल,संतोष उनोने,अतुल घोडके,नागपुर, टोंगळे गुरुजी, अचलपुर, नंदकिशोर राठी समवेत श्रीमद भागवत सेवा समिती व संत श्री राधे राधे महाराज भक्त परिवाराने परिश्रम घेतले.

# एनएच–५३ वर भरधाव कारचा कहर; लुना चालक गंभीर जखमी

## मुर्तिजापूर ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल,आरोपी कार चालक फरार

▪मुर्तिजापुर,दि.८ (प्रतिनिधी)▪

तालुक्यातील नागठाना ग्रामाजवळ एनएच–५३ महामार्गावर भरधाव व निष्काळजी कारचालकामुळे भीषण अपघात घडला. पांढऱ्या रंगाच्या मारुती सुझुकी सेलेरिओ कार (चक २७ एउ ३३९२) ने लुना (चक३०उअ ४२५१) चालक ज्ञानेश्वर रामभाऊ सोळंके यांना जोरदार धडक दिली. या अपघातात सोळंके यांच्या डोक्याला, हाताला व दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाली. जखमी अवस्थेत त्यांना प्रथम मुर्तिजापूर उपजिल्हा रुग्णालय, त्यानंतर अकोला व पुढे नागपूर मेडिकल कॉलेज येथे हलविण्यात आले असून त्यांची प्रकृती गंभीर आहे. फिर्यादी निखिल गणेश सोळंके यांच्या तक्रारीवरून मुर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपी कारचालकाविरोधात भा.न्या.सं. कलम २८१, १२५ (अ), १२५ (ब) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास ठाणेदार श्रीधर गुठ्ठे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस हवा मनिष मालठाणे करीत असून आरोपीचा शोध सुरू आहे.




# |CCI ने कापूस नोंदणीला दिली मुदतवाढ !

अकोला : कापूस खरेदीसाठी आवश्यक असलेली ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया ३१ डिसेंबर २०२५ रोजी बंद होणार होती. मात्र, आता ही नोंदणी प्रक्रिया १६ जानेवारी २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे.यामुळे कापूस उत्पादकशेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.भारतीय कापूस महामंडळाने म्हणजेच सीसीआयने ही माहिती मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाला दिली आहे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यापूर्वी भारतीय कापूस महामंडळाने अधिकृत कापूस खरेदी केंद्रांवरील नोंदणी प्रक्रिया ३१ डिसेंबरला बंद करण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय शेतकऱ्यांच्या हिताविरुद्ध असल्याचा आरोप करत जनहित याचिकाकर्ते श्रीराम सातपुते यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेच्या सुनावणीदरम्यान न्यायालय मित्रअ‍ॅड.पुरुषोत्तम पाटील यांनी शेतकऱ्यांची बाजू मांडली. सुटीकालीन न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या समोर या प्रकरणाची सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान अ‍ॅड. पाटील यांनी सांगितले की, विदर्भासह राज्यातील अनेक भागांत कापूस उत्पादन एकाच वेळी होत नाही.

### विश्व सिंधी सेवा संगमच्या जिल्हाध्यक्ष पदी हरीश पारवानी

▪अकोला,दि.८ (प्रतिनिधी)▪

अखिल विश्वात सेवाभावी कार्य करणाऱ्या सिंधी समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विश्व सिंधी सेवा संगम या संस्थेच्या अकोला जिल्हाध्यक्ष पदावर स्थानिक सिंधी कॅम्प परिसरात राहणारे आणि समाजसेवक हरीश बनवारीलाल पारवानी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सेवा संगमच्या वतीने दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, ज्यामध्ये सिंधी भाषेचा प्रचार–प्रसार करण्या सोबतच वर्षभरात १२ सिंधी उत्सव साजरे केले जातात.पारवानी विविध सेवा संस्थांमध्ये कार्यरत असून, ते सिंधी सखर पंचायतचे अध्यक्ष तसेच अनेक संस्थांचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या या उपलब्धीचे समाजात स्वागत केले जात आहे.

# श्री गजानन महाराज सामूहिक महापारायण मूर्तिजापुरात भक्तीचा महासंगम

▪मुर्तिजापुर,दि.८ (प्रतिनिधी)▪

जागतिक पारायण दिनाचे औचित्य साधत श्री गजानन महाराज भक्त परिवार, मूर्तिजापुर यांच्या वतीने यंदाही भक्तिभावाने ओथंबलेले निशुल्क सामूहिक श्री गजानन विजय ग्रंथ महापारायण भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आले आहे. तिडके नगर येथील श्री वेंकटेश बालाजी इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हा आध्यात्मिक सोहळा संपन्न होणार आहे.या महापारायणाचे वैशिष्ट्य म्हणजे



जगप्रसिद्ध मुखोद्गत पारायण वाचिका सौ. विद्याताई पडवळ–उनवणे (ठाणे)

यांच्या सुमधुर व प्रभावी वाणीतून अध्याय महात्म्य, पारायण वाचन व संक्षिप्त निरूपण होणार असून उपस्थित भक्तांना आध्यात्मिक समाधानाचा अमृतानुभव मिळणार आहे.

पंचक्रोशीतील सर्व श्री भक्त प्रेमींनी आपापले विजय ग्रंथ सोबत आणून मोठ्या संख्येने व वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. पारायणकर्त्यांनी पिवळी अथवा केसरी साडी/ड्रेस परिधान करणे अपेक्षित आहे. सहभागी सर्व भक्तांसाठी चहा, फराळ व महाप्रसादाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे.

# अकोल्यात दुचाकीसाठी नवीन MH30CC मालिका सुरू

▪अकोला,दि.८ (प्रतिनिधी)▪

प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकोला येथे अकोला कार्यक्षेत्रातील रहिवाशांसाठी दुचाकी वाहनांसाठी नवीन चक३०उउ नोंदणी मालिका सुरू करण्यात आली आहे. आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक इच्छुक वाहनधारकांना विहित शुल्क भरून राखीव करता येणार आहेत. यासाठी अर्जदारांनी दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या वेळेत प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकोला येथे अर्ज सादर करावेत.

एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास लिलाव पद्धतीने क्रमांक निश्चित करण्यात येईल. लिलावाची यादी त्याच दिवशी सायंकाळी ४ वाजता नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केली जाणार असून, पात्र अर्जदारांसाठी दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी लिलाव प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. पसंतीच्या क्रमांकासाठी महाराष्ट्र शासनाच्या नियमांनुसार विहित शुल्क आकारले जाणार असून, राखीव क्रमांकाची वैधता १८० दिवसांची राहील. या कालावधीत वाहन नोंदणी न झाल्यास क्रमांक रद्द होऊन तो पुन्हा सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध होईल. सदर लिलावानंतर उर्वरित आकर्षक व पसंतीचे क्रमांक नागरिकांना सीटीझन पोर्टलद्वारेही उपलब्ध होतील, अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी रविंद्र भुयार यांनी दिली.

# अंबाशी ९ मेगावॅट सौर प्रकल्प कार्यान्वित, १८०० शेतकऱ्यांना दिवसा वीज

## जिल्ह्यातील ३६ हजार शेतकऱ्यांना मिळत आहे दिवसा वीज

▪अकोला,दि.८ (प्रतिनिधी)▪

जिल्ह्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत पातुर तालुक्यातील अंबाशी येथे उभारण्यात आलेला ९ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला असून, त्यामुळे ३३ केव्ही आलेगाव उपकेंद्राअंतर्गत येणाऱ्या तब्बल १ हजार ८०० शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा सुरू झाला आहे. जिल्ह्यात आतापर्यंत २९ सौर प्रकल्पांमधून १२३ मेगावॅट वीज निर्मिती सुरू झाली असून, याचा थेट लाभ ३६ हजार २०२ शेतकऱ्यांना मिळू लागला आहे. रात्रीच्या विजेपासून सुटका होऊन दिवसा नियमित आणि शाश्वत वीज मिळाल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.शासन आणि महावितरणच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ४४ उपकेंद्रांसाठी २१२ मेगावॅट वीज निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्या दिशेने वेगाने वाटचाल सुरू असून एकामागून एक प्रकल्प कार्यान्वित होत आहेत. अंबाशी प्रकल्प हा मे.मेघा इंजिनिअरींग या विकासकामार्फत ४५ एकर क्षेत्रावर उभारण्यात आला आहे. येथून निर्माण होणारी वीज ३३ केव्ही वाहिनीद्वारे महावितरणच्या ३३ केव्ही आलेगाव उपकेंद्राशी जोडण्यात आली आहे.



या प्रकल्पामुळे ३३ केव्ही उपकेंद्रांतून वीज पुरवठा होणाऱ्या परिसरातील १ हजार ८ शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा सुरू झाला आहे.मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली व अधीक्षक अभियंता प्रतिक्षा शंभरकर यांच्या पुढाकारातून जिल्ह्यात सौर प्रकल्पांची कामे गतीने सुरू आहेत. प्रकल्प पूर्ण होताच ते तत्काळ कार्यान्वित करून शेतकऱ्यांना लाभ दिला जात असल्याने जिल्ह्यातील ३६ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना रात्रीच्या विजेपासून दिलासा मिळाला आहे.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## ई-निविदा सूचना ६८/२०२५-२६

१. **वि सं वि ई.नि ३६३ / कोड ३०००६४५६१ :-** औ.वि.के. पारस २५० मे वॅ युएटी ए आयसी इनकमर एचटी बोर्ड पॅनेलची दुरूस्ती, रिस्टोरेशन करण्याच्या कामाचा कंत्राट. (**Esti.** रू :- २२.३३ लाख, **EMD** रू :- २५८४०/-)

२. **विसंवि ई. नि ३६४ / कोड ३०००६४५२४ :-** औ.वि.के. पारस २५० मे वॅ येथे स्थापीत एल टी आणि एच टी मोटर्सचे सर्व्हिसिंग, ओव्हरहॉलींग करिता व्दिवार्षिक मेन्टेनन्स् कामाचा कंत्राट. (**Esti.** रू :- ३१.५२ लाख, **EMD** रू :- ३५०२०/-)

**१) ई निविदा अ.क्र. १ ते २ विक्रिचा कालावधी दि. ०९.०१.२०२६ ते २९.०१.२०२६ सादर करण्याची दि ३०.०१.२०२६ वेळ १६.00 वा.**

टीप. सविस्तर माहिती करीता कृपया आमची वेबसाईट पहावी
https://eprocurement.mahagenco.in

**मुख्य अभियंता औ.वि. केंद्र, पारस**

# मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मनपा सज्ज

▪अकोला,दि.८ (प्रतिनिधी)▪

अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात आज दि. ८ जानेवारी २०२६ रोजी अकोला महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे मनपा उपायुक्त विजय पारतवार यांच्याव्दारे मतदानाचा टक्केवारी मध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने मतदान केंद्र पर्यवेक्षक यांची मतदान चिठ्ठी वितरण संदर्भात बैठक संपन्न झाली आहे.

या बैठकीमध्ये अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अन्वये अकोला महानगरपालिका व्दारा विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येत असून प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेकरीता आवश्यक असलेल्या मतदान स्लीप वाटप करण्याचे कार्यही आवश्यक असून अकोला महानगरपालिकेच्या एकूण २० प्रभागांसाठी मतदार





यादीवर काम करणारे ५० पर्यवेक्षकांना तसेच त्यांच्या अधिनस्त ५०० बी.एल.ओ. आणि १५० आशा वर्कर असे एकुण ६५० कर्मचा-यांच्या माध्यमातून मतदान चिठ्ठी वितरण करण्यात येणार असून सदरचे काम दि. ९ जानेवारी पासून ते १३ जानेवारी २०२६ पर्यंत पुर्ण करणे, तसेच या संदर्भात मतदारांना १०० टक्के सहकार्य करणे आदींबाबात सुचना मनपा उपायुक्त विजय पारतवार यांनी यावेळी दिली आहे.

या बैठकीत मनपा उपायुक्त विजय पारतवार, निवडणूक विभाग प्रमुख अनिल बिडवे, छपाई साहित्य नोडल अधिकारी तथा शहर अभियान व्यवस्थापक संजय राजनकर, मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अनुप चौधरी, जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा यांचेसह सर्व पर्यवेक्षकांची उपस्थिती होती.

# अकोला महानगरपालिकेच्या विविध शाळेंच्या विद्यार्थ्यांव्दारे रॅलीच्या माध्यमातून मतदार जनजागृती




▪अकोला,दि.८ (प्रतिनिधी)▪

अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले असून या अनुषंगाने आज दि. ८ जानेवारी २०२६ रोजी अकोला महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांव्दारे मतदान जनजागृती रॅली, काढून शाळापरिसरांमध्ये मतदान जनजागृती करण्यात आली आहे. या रॅलींच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदानाचे महत्त्व, लोकशाहीतील सहभाग आणि जबाबदार मतदाराची भूमिका याबाबत जागृत करण्यात येत आहे. आजच्या जनजागृती रॅलीमध्ये महानगरपालिका गुजराती शाळा क्रमांक १, महानगरपालिका सिंधी हिंदी शाळा क्रमांक १, आर्य समाज मंदिर, डीएव्ही कॉन्व्हेंट अकोला तसेच स्वावलंबी विद्यालय अशा ५ शाळांचा समावेश




होता. सदर रॅलीची सुरूवात मनपा शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी मतदार जनजागृती हरिश्चंद्र इटकर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आली.यावेळी नोडल अधिकारी नईम फरास, मुख्याध्यापक गजेंद्र ढवळे, मुख्याध्यापक युवराज पठाडे सर, हरीश शर्मा सर, राहुल जी ठाकूर, विपुल राणा, यांचे सह सर्व शाळांचे शिक्षक तसेच पालक वर्गाची उपस्थिती होती.

# अकोला पोलीस दलाच्या आपले सरकार पोर्टलवर १७ ऑनलाईन सेवा उपलब्ध !

## नागरिकांना घरबसल्या प्रमाणपत्रे व परवानगीचा लाभ..!

▪अकोला,दि.८ (प्रतिनिधी)▪

महाराष्ट्र शासनाच्या आपलें सरकार या अधिकृत पोर्टलच्या माध्यमातून नागरिकांना सुलभ, पारदर्शक व वेळेत सेवा मिळाव्यात, या उद्देशाने अकोला पोलीस दलाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. अकोला पोलीस दलाच्या एकूण १७ विविध ऑनलाईन सेवा आता आपलें सरकार पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सेवांमुळे नागरिकांना पोलीस स्टेशनला प्रत्यक्ष उपस्थित न राहता घरबसल्या विविध प्रमाणपत्रे, परवानग्या व ना-हरकत प्रमाणपत्रांसाठी अर्ज करता येणार असून, त्यामुळे वेळ, खर्च व अनावश्यक त्रास टळणार आहे. आपलें सरकार पोर्टलवरील अकोला पोलीस दलाच्या १७ ऑनलाईन सेवा पुढीलप्रमाणे:

(१) विदेश कलाकारांच्या सहभागास परवानगी (२) कागदपत्रांचे साक्षांकन (३) भारतीय नागरिकांसाठी नो ऑब्लिगेशन टू रिटर्न टू इंडिया (छजठख) प्रमाणपत्र (४) पोलीस क्लिअरन्स प्रमाणपत्र (५) विदेशी नागरिकांचे नागरिकत्व प्रस्ताव केंद्र शासनास पाठविणे (६) तक्रारदारास प्रथम खबरी अहवालाची (ऋखठ) प्रत उपलब्ध करून देणे (७) ध्वनिक्षेपकाचा (लाऊडस्पीकर) वापर परवाना (८) मनोरंजनाच्या कार्यक्रमांसाठी ना-हरकत परवाना (९) सभा, संमेलन, मिरवणूक व शोभायात्रांसाठी परवानगी (१०) विदेशी नागरिकांना निवासासाठी मुदतवाढ देण्याबाबत ना- हरकत प्रमाणपत्र (११) भारतात परत येण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र (१२) पासपोर्ट पडताळणीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र (१३) निमशासकीय, खाजगी संस्था इत्यादी ठिकाणी नोकरीसाठी वर्तणूक व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र (१४) पेट्रोल पंप, गॅस एजन्सी, हॉटेल, बार आदींसाठी ना-हरकत प्रमाणपत्र ( १५ ) शस्त्र परवान्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र ( १६ ) भारतीय नागरिकांना परदेशात जाण्यासाठी पोलीस अनुमती प्रमाणपत्र (शिक्षण / नोकरीसाठी (व्हिसा ) (१७) तिबेटियन नागरिकांना भारतात परत येण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र तसेच इतर विविध पोलीस सेवा आता पूर्णतः ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. घरबसल्या सेवा पारदर्शक व विश्वासार्ह व्यवस्था, ऑनलाईन प्रणालीमुळे सेवा प्रक्रियेत पारदर्शकता वाढली असून नागरिकांना आपल्या अर्जाची सद्यस्थिती (अर्श्रिळलरींळेप डीरींीी) आपलें सरकार पोर्टलवर सहजपणे पाहता येणार आहे. यामुळे नागरिकांचा विश्वास वाढण्यासोबतच प्रशासनातील कार्यक्षमतेतही लक्षणीय वाढ होणार आहे.नागरिकांनी ऑनलाईन सेवांचा लाभ घ्यावा - अकोला पोलीस दलाचे आवाहन डिजिटल इंडिया व ई- गव्हर्नन्सच्या दिशेने उचललेले हे पाऊल नागरिकाभिमुख प्रशासनाचे उत्तम उदाहरण असून अकोला पोलीस दल नागरिकांना अधिकाधिक सुलभ, पारदर्शक व तत्पर सेवा देण्यासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे यानिमित्ताने स्पष्ट होते.

अकोला पोलीस दलाकडून नागरिकांनी आपलें सरकार पोर्टलवरील या ऑनलाईन सेवांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पत्रकार संघातर्फे पत्रकारदिन उत्साहात साजरा

▪अकोट,दि.८ (प्रतिनिधी)▪

आकोट तालुका पत्रकार संघातर्फे स्थानिक गौरक्षण संस्थान येथे पत्रकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी पत्रकार बांधवांनी मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक दर्पणकार आचार्य कै.बाळशास्त्री जांभेकर यांना विनम्र अभिवादन केले. अ.भा. मराठी पत्रकार परिषद मुंबई अंतर्गत अकोला जिल्हा पत्रकार संघ सलग्न अकोट तालुका पत्रकार संघातर्फे पत्रकार दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मंगेश लोणकर हे होते. तर ज्येष्ठ पत्रकार कुंजीलाल कोठारी,जिल्हा पत्रकार संघाचे सचिव विजय शिंदे, ज्येष्ठ पत्रकार दीपक देव,गौरक्षण संस्थेचे सचिव प्रा.डॉ. सुधिर मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. तद्नंतर पत्रकार देव यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. शिंदे,कोठारी व लोणकर यांची सम



योचीत भाषणे झालीत,डॉ मुळे गौरक्षण संस्था व संस्थेच्या कार्याबध्दल माहिती दिली याप्रसंगी पत्रकार निलेश नवघरे हे नगरपरिषद सदस्य म्हणून निवडून आल्याबद्दल त्यांचा प्रमुख उपस्थितांच्या हस्ते शाल , श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला तसेच मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान तालुकास्तर मुल्यमापन समितीवर सदस्य म्हणुन नियुक्ती झाल्याबध्दल पत्रकार विजय शिंदे यांचा सत्कार करण्यात आला, कार्यक्रमाला पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष हरीओम व्यास, जेष्ठ पत्रकार अशोक मंगलानी, हरिदास चेडे, वामन जकाते, अशोक नागळे, विद्याधर कोठीकर, रमेश तेलगोटे, रविंद्र उर्फ लकी इंगळे, लक्ष्मीकांत व्यास, अभिषेक पाठक आदीसह गायत्री परिवारचे दादाराव गावंडे, ओमप्रकाश हेडा, अनिल केला,मनिष इटनारे,आकाश गोरले, रवी टिकार यांचे सह वृत्तपत्र विक्रेता संजय जोशी, सतीश देशमुख, गणेश लोणकर, गणेश अवचार, गिरीश कथले उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका पत्रकार संघाचे सचिव वसीम खान व संचालन संतोष विणके यांनी केले. तर आभार प्रदर्शन हरिदास चेडे यांनी केले.

# रक्ताचा कर्करोग असणाऱ्या रुग्णास डॉ.मनोज अग्रवाल यांचा मदतीचा हात

▪अकोला,दि.८ (प्रतिनिधी)▪

असाध्य रक्ताचा कर्करोग असणाऱ्या रुग्णास उपचारासाठी डॉ मनोज अग्रवाल यांनी उपचारासाठी आर्थिक मदतीचा हात देत आपले सामजिक दायित्व पूर्ण केले.आकाश कांशीराम लोकरे या युवकास असाध्य असा ब्लड कॅन्सर अर्थात रक्ताचा कर्करोग जडला.जीवन मरणाच्या दुष्टचक्रात अडकलेल्या या रुग्णाची आर्थिक परिस्थिती वाईट असून त्याच्या उपचारात दिले जाणारे औषध हे इथे उपलब्ध नसून ते महागडे औषध बांगलादेशातून आयात करवे लागते.या संदर्भात त्याच्या उपचाराची माहिती मिळताच लायन्स क्लब ऑफ अकोला मिडटाऊनचे अध्यक्ष व जेष्ठ समाजसेवी डॉ मनोज अग्रवाल यांनी पुढाकार घेत आकाश कांशीराम लोकरे यास गुरुवारी जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते उपचारासाठी धनादेश प्रदान केला.यावेळी लायन्स क्लब मिडटाऊनचे सुभाष चांडक,महेश मनवाणी,सुनील जेसवानी,संजय राऊत, प्रशांत



फुलारी, बाळासाहेब काळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.आकाश लोकरे याला मदत मिळण्यासाठी प्रयास बहुउद्देशीय संस्था रिधोरा ही संस्था अथक परिश्रम घेत असून स्वयंसेवी संस्था व दानशूर व्यक्तींनी रक्त कर्करोग रुग्ण होते.

# सावित्रीबाई फुले विद्यालयात सावित्री उत्सव उत्साहात साजरा

**अकोला :** क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांनी अनंत हाल अपेष्टा सहन करत स्त्री शिक्षणाची वाट मोकळी करून दिली. त्यांच्या त्यागातुनच आज समाज प्रगती च्या दिशेने वाटचाल करीत आहे. त्यांच्या कार्याचे स्मरण करून ते आचरणात आणणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ सत्यशोधक महादेवराव भुईभार यांनी अध्यक्षीय भाषणातून केले. सावित्रीबाई फुले विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती निमित आयोजित सावित्री उत्सव कार्यक्रमात बोलत होते. शाळा समिती सदस्य वसंतराव गावडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी विदयार्थ्यांनी एकपात्री प्रयोग, भारूड, कविता, गाणी सादर केली कार्यकमाचे संचालन सौ. ज्योती इंगळे यांनी केले.

### आ. हरीश पिंपळे यांच्या हस्ते मूर्तिजापूरात पत्रकार दिनाचा दणकेबाज सोहळा

# दुपट्टा, ट्रॅव्हलिंग हॅन्डबॅग व पुष्पगुच्छाने पत्रकारांचा गौरव; सामूहिक जेवणातून स्नेहबंध

▪मुर्तिजापुर,दि.८ (प्रतिनिधी)▪

मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिन मूर्तिजापूरात उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात आमदार हरीश पिंपळे यांच्या पुढाकारातून तालुक्यातील प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडिया तसेच युट्युबर्स यांचा भव्य सत्कार करण्यात आला. दीपप्रज्वलन व आचार्य जांभेकर यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी आमदार हरीश पिंपळे, नवनियुक्त नगराध्यक्ष हर्षल साबळे, नगरसेवक, भाजपा कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते उपस्थित सर्व पत्रकारांचा दुपट्टा, ट्रॅव्हलिंग हॅन्डबॅग व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.




पत्रकारांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा क्षण उपस्थितांसाठी भावनिक ठरला.मार्गदर्शन करताना आ. हरीश पिंपळे म्हणाले की, पत्रकार हा लोकशाहीतील चार स्तंभांपैकी अत्यंत महत्त्वाचा स्तंभ असून समाजमनाचा खरा आरसा आहे. सत्य निर्भीडपणे मांडताना लेखणीने कुणावर अन्याय होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. ज्येष्ठ पत्रकार दिलीप देशमुख, अविनाश बेलाडकर व पी. एन. बोळे यांनी बदलत्या काळातील पत्रकारितेतील आव्हाने, निपक्षपाती भूमिका व अनुभव कथन केले.

# प्रभातची श्रीया बोडखे हिने १३ वी आंतरराष्ट्रीय कराटेमध्ये पटकाविले सुवर्ण पदक

▪अकोला,दि.८ (प्रतिनिधी)▪

प्रभात किड्स स्कूलची श्रीया अमोल बोडखे हिने फरीदाबाद, दिल्ली येथे दि. २६ ते २८ डिसेंबर दरम्यान झालेल्या सहावी राष्ट्रीय कराटे स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केले तर १३ वी आंतरराष्ट्रीय स्तरावरसुद्धा श्रीयाने सुवर्ण पदक प्राप्त केल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.शितो-रियो कराटे स्कूल ऑफ इंडीया, दिल्ली यांच्या वतीने राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय कराटे स्पर्धेचे आयोजन दि. २६ ते २८ डिसेंबर रोजी करण्यात आले होते. यामध्ये तब्बल ६ देशामधील खेळाडूंनी यामध्ये सहभाग घेतला होता. भारत, नेपाळ, बांग्लादेश, जापान, उस्बेकिस्तान व इराण या देशामधून विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. १२ ते १३ वर्षाआतील व ३० ते ३४ वजनगटामध्ये अकोला येथील प्रभात किड्स स्कूलची विद्यार्थीनी श्रीया अमोल बोडखे हिने कराटेमध्ये कुमीते (फाईट) या




प्रकारामध्ये राष्ट्रीय स्तरावर व आंतराष्ट्रीय स्तरावर सुवर्ण पदक प्राप्त केले.प्रभातचे क्रीडा प्रशिक्षक प्रकाश गुडीकुंडलवार व संजीवनी गावंडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे, सचिव निरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, समनव्यक मो. आसिफ व क्रीडा विभाग प्रमुख स्वप्निल मांदाळे व उप क्रीडाप्रमुख आशिष बेलोकार यांच्यासह शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचार्यांनी कौतुक केले. व श्रीया बोडखे हिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पातुर आरोग्य विभागाच्या वतीने तालुक्यात २३ कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेचे शिबिर यशस्वी

▪पातुर,दि.८ (प्रतिनिधी)▪

पातुर तालुका जिल्हा परिषद आरोग्य विभागा च्या वतीने तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेसाठी दि. ७/ १/ २०२६ रोजी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करिता स्व. नलिनीताई राऊत एम. बी. बी. एस कॉलेज पातुर येथे लेप्रोस्कोपी शस्त्रक्रिया शिबिर राबवण्यात आली माननीय जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ बळीराम गाढवे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत पवार, माता बाल संगोपन अधिकारी डॉ विनोद करंजीकर यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गजानन इंगळे व यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी पातुर डॉ. लोखंडे यांच्या उपस्थितीमध्ये शस्त्रक्रियेचे पूर्ण नियोजन केले होते एकूण २३ कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करिता पात्र लाभार्थी असून एका टाक्याची शस्त्रक्रिया



लेप्रोस्कोपी कॅम्प नियोजनबद्ध आखणी करून आज दि. ७/ १ /२०२६ रोजी येथे सर्जन डॉ. सिरसाम यांच्या हस्ते यशस्वी रित्या पार पडला कुठल्याही प्रकारचे गुंतागुंत व कुठल्याही प्रकारची कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया लाभार्थींची गैरसोय होणार नाही याची दक्षता आरोग्य विभागामार्फत पुरेपूर घेण्यात आली व कॅम्प यशस्वीरित्या पार पडला. यासाठी तालुक्यातील पाच ही प्राथमिक आरोग्य केंद्र मधील वैद्यकीय अधिकारी औषधी निर्माण अधिकारी आरोग्य सहाय्यक आरोग्य सहायिका आरोग्य सेवक आरोग्य सेविका सर्व कर्मचाऱ्यांनी नियोजन मध्ये सहभाग घेतला.पातुर तालुक्यातील कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिर यशस्वी संपन्न झाला.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८६ महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, **समूह संपादक :** संदीप रामराव काळे, **प्रबंध संपादक :** पंकज श्रीकृष्ण चांडक
**स्थानिक संपादक :** *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील )

# मौसम नूर : काँग्रेससाठी आशेचा किरण!

६ डिसेंबर १९९२ रोजी अयोध्या येथील बाबरी मशिद पाडण्यात आली.त्याचे औचित्य साधून पश्चिम बंगाल मधील तृणमूल काँग्रेसचे आमदार हुमायून कबीर यांनी मुर्शिदाबाद मधील बेलडांगा येथे त्याच दिवशी मशिदीच्या (बाबरी मशिदीची प्रतिकृती) पायाभरणीची घोषणा केली.

ठरल्याप्रमाणे त्यांनी मशिदीच्या पायाभरणीचा कार्यक्रम पार पाडला. त्या कार्यक्रमाला त्यांचे पाठिराखे मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. हे पाठिराखे पुर्वी तृणमूल काँग्रेसचे कट्टर समर्थक होते. तृणमूल काँग्रेसने, हुमायून कबीर यांच्या कार्यक्रमाला विरोध केला होता.परंतु हुमायून कबीर यांनी त्या विरोधाकडे दुर्लक्ष करून आपला कार्यक्रम पार पाडला होता. कबीर यांच्या पक्षविरोधी कृतीमुळे त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली होती. त्यानंतर कबीर यांनी जनता उन्नयन पार्टी या पक्षाची स्थापना केली.

हुमायून कबीर यांनी नव्या पक्षाची स्थापना केल्याने, ममता बॅनर्जी यांच्या पक्षाला त्याचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. हुमायून कबीर हे पश्चिम बंगाल विधानसभेच्या एकूण २९४ जागांपैकी १३५ जागांवर आपले उमेदवार उभे करणार आहेत. कबीर यांच्या पक्षाला पुढील वर्षी होणाऱ्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत फारसे यश मिळाले नाही तरी मुस्लिम मतांमध्ये त्यांच्या पक्षाने मोठ्या प्रमाणात विभाजन घडवून आणल्यास, त्याचा फटका तृणमूल काँग्रेसला बसेल आणि भाजपाला त्याचा फायदा होऊ शकेल.

तृणमूल काँग्रेसच्या राज्यसभेच्या खासदार मौसम नूर यांनी नुकताच पक्षाचा राजीनामा देऊन, काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याने, ममता बॅनर्जी यांच्या पक्षाला आणखी एक धक्का बसला आहे. मौसम नूर या काँग्रेसचे बडे नेते ए.बी.ए.घनीखान चौधरी यांच्या पुतणी आहेत.

घनीखान चौधरी हे माल्डा मधील काँग्रेसचे ताकदवान नेते होते. माल्डा लोकसभा मतदारसंघातून ते ८ वेळा काँग्रेसच्या तिकिटावर विजयी झाले होते. इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या सरकारमध्ये ते मंत्री होते.

अशी भक्कम पार्श्वभूमी असलेल्या मौसम नूर यांनी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर तृणमूल काँग्रेसचा राजीनामा दिल्याने, ममतांना धक्का बसणे स्वाभाविक आहे. पश्चिम बंगालमध्ये अतिशय दयनीय अवस्था झालेल्या काँग्रेससाठी ही दिलासादायक बाब मानावी लागेल.

माल्डा आणि मुर्शिदाबाद या मुस्लिम बहुल भागात पुर्वी काँग्रेस मजबूत अवस्थेत होती. २०१६ पर्यंत माल्डा हा भाग काँग्रेसचा बालेकिल्ला होता.२०१६ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत माल्डा विभागातील विधानसभेच्या एकूण १३ जागांपैकी ८ जागा जिंकून काँग्रेसने चांगली कामगिरी केली होती.



मौसम नूर यांची आई रुबी नूर या पश्चिम बंगाल मधील सुजापूर विधानसभा मतदारसंघातून चार वेळा काँग्रेसच्या तिकिटावर विजयी झाल्या होत्या. २००९ मध्ये रुबी नूर यांच्या निधनामुळे झालेल्या विधानसभा (सुजापूर) पोटनिवडणूकीत मौसम नूर या काँग्रेसच्या तिकिटावर विजयी झाल्या. त्याचवर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने मौसम नूर यांना माल्डा (उत्तर) मतदार संघातून उमेदवारी दिली आणि त्या निवडून आल्या. २०१४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत मौसम नूर या पुन्हा एकदा त्याच मतदार संघातून विजयी झाल्या.



अभय गोखले

मौसम नूर यांनी कायद्याची पदवी प्राप्त केली आहे. २०११ मध्ये त्या पश्चिम बंगाल युवा काँग्रेसच्या अध्यक्ष झाल्या. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या निकटवर्तीयांमध्ये नूर यांचा समावेश होता. २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मौसम नूर यांनी काँग्रेसचा राजीनामा दिला. लोकसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेस बरोबर युती करण्याचा नूर यांचा प्रस्ताव काँग्रेस नेतृत्वाने नाकारल्याने, त्यांनी काँग्रेसचा राजीनामा दिला होता.

त्यानंतर नूर यांनी तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला.२०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने नूर यांना माल्डा (उत्तर) मतदारसंघातून उमेदवारी दिली. मात्र भाजपाचे उमेदवार खागेन मुर्मू यांनी त्यांचा पराभव केला.

नंतर २०२० मध्ये तृणमूल काँग्रेसने नूर यांना राज्यसभेत पाठवले. त्यांची मूदत एप्रिल २०२६ मध्ये संपत आहे. लवकरच होणाऱ्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत,नूर या बहुदा सुजापूर मतदार संघातून काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवतील. नूर यांच्या काँग्रेस प्रवेशामुळे पक्षाची ताकद निश्चितपणे वाढली आहे.

२०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची पाटी कोरी राहिली होती. मात्र नूर यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने माल्डा विभागातील विधानसभेच्या काही जागांवर काँग्रेसला विजय मिळू शकेल.

लवकरच होणाऱ्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत मौसम नूर या काँग्रेसच्या स्टार प्रचारक असू शकतील.माल्डा विभागात तृणमूल काँग्रेसची फारशी ताकद नाही. तेथे लढत ही प्रामुख्याने काँग्रेस आणि भाजपा यांच्यातच होत असते.

२०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत माल्डा या आपल्या बालेकिल्ल्यात काँग्रेसला एकही जागा जिंकता आली नव्हती. नूर यांनी तृणमूल काँग्रेसचा राजीनामा दिल्याने, मुस्लिम बहुल माल्डा विभागातील मुस्लिम समाजाची मते काँग्रेस, तृणमूल काँग्रेस मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डावी आघाडी आणि हुमायून कबीर यांचा पक्ष, जनता उन्नयन पार्टी यांच्यात विभागली जातील आणि त्याचा फायदा भाजपाला मिळू शकेल. थोडक्यात हुमायून कबीर आणि मौसम नूर यांनी तृणमूल काँग्रेसचा राजीनामा दिल्याने ममतांचे टेंशन वाढले असेल.

# सामाजिक जाणिवांच्या कक्षेतून समाजसेवा



घरच्या समृध्द अशा औषध व केमिकलच्या व्यवसायात व्यस्त असताना, समाजसेवक सुनील दावडा यांच्या मनाने घेतले की, स्वतःसाठी जगत असताना आपले आयुष्य घडविण्यात ज्या समाजाचे ऋण आपल्यावर आहे ते आपण होईल त्यापरीने फेडले पाहिजे.

सेवाभावी वृत्तीचे वडील ईश्वरलाल दावडा यांची प्रेरणा सदैव त्यांना मार्गदर्शक राहिली आणि त्यांना दिशा मिळाली. रोटरॅक्ट, रोटरी क्लब, मोबिलिटी समिती, शांतता समिती अशा अनेक स्तरावरून त्यांच्या सामाजिक जाणिवांच्या कक्षा रुंदावत गेल्या आणि त्यांच्या हातून समाजसेवेचे पुण्य घडत गेले.




mahasagarngp@gmail.com

१९७८ ला युवांसाठी असलेले रोट्रॅक्ट क्लब ऑफ सोलापूर नॉर्थशी ते जुळले आणि मोठ्या प्रमाणावर त्यांनी रक्तदान शिबिरे आणि वृक्षारोपण केले. त्यांच्या कामाचा वेग आणि हुरूप पाहता १९८४ मध्ये रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थचे सदस्यत्व त्यांना मिळाले. या माध्यमातून स्त्री व पुरुषांसाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात आरोग्य शिबिरे घेतली.

सुनील दावडा भाऊक होऊन सांगतात की, गेल्या ५० वर्षांपासून रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ तर्फे अपंगांसाठी राधाकिसन फोमरा मूकबधिर विद्यालय खूप चांगल्या पद्धतीने चालविल्या जात आहे. पाच विद्यार्थ्यांपासून सुरू झालेली ही शाळा आता ७८ विद्यार्थ्यांपर्यंत येऊन पोहोचली आहे. या शाळेत सचिव पदावर असलेले दावडा यांनि रोटरी क्लब आणि इतर दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून ही शाळा आधुनिक सोईसुविधा आणि तंत्रज्ञानाच्या दृष्टिकोनातून विकसित केली.

या शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, मोफत श्रवणयंत्र,शैक्षणिक साहित्य, नेत्र तपासणी करून मोफत चष्मे, मोफत बससेवा सढळ हाताने पुरविण्यात येतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी येथे सांस्कृतिक कार्यक्रमासोबतच थोर पुरुषांच्या जयंत्या पुण्यतिथ्या साजऱ्या करून समाजातील आदर्श व्यक्तींकडून मार्गदर्शन केल्या जाते. ते मोठ्या गवार्ने सांगतात की आतापर्यंत कोणी नापास झाले नसून येथून शिकून गेलेल्या मुलांपैकी ३० विद्यार्थी शासकीय सेवेत तर ५ ते ६ मुले वर्ग १ च्या पदावर आहेत.

याशिवाय रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ तर्फे गेल्या ३० वर्षांपासून अपंगांसाठी दमाणी अंध शाळा चालवल्या जात आहे. ही शाळा निवासी असून ४० विद्यार्थी आहेत. या शाळेतून पास होऊन गेलेले अनेक विद्यार्थी शासकीय सेवेत आहेत. १९८६ ला रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ या आंतरराष्ट्रीय संस्थेचे सदस्यत्व त्यांना प्राप्त झाले. आणि आतापर्यंत आपल्या कार्यकुशलतेतून अनेक वेळा संचालक,कमिटी चेअरमन इत्यादी पदांवर ते काम करीत आहेत.

रोटरी क्लबद्वारे अनेक दलीत वस्त्यांमध्ये झोपडपट्टी भागात आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी,मोफत चष्मे वाटप, शैक्षणिक साहित्य वाटप, मोफत मोती बिंदू ऑपरेशन, वृक्षारोपण आदी कार्यक्रम केले जातात.

याशिवाय गेल्या अनेक वर्षांपासून सोलापूर शहर पोलिस शांतता आणि मोहल्ला समिती यावर सदस्य म्हणूनही ते कार्यरत आहेत.तसेच गेल्या २४ वर्षांपासून सोलापूर शहर पोलिस वाहतूक सल्लागार समितीवर सदस्य आहे. अनेक शाळा, महाविद्यालय, सिद्धेश्वर यात्रेत, महानगरपालिका इत्यादी ठिकाणी वाहतूक प्रबोधन शिबिरे, पोस्टर प्रदर्शने आयोजित केली आहेत.

त्याचप्रमाणे वाहतुकीचे नियम पाळण्यासंबंधी ३० मिनिटांची फिल्म अनेक ठिकाणी प्रदर्शित करून प्रबोधन केल्या जाते. गेल्या १४ वर्षांपासून सोलापूर महानगरपालिकेचा मोबिलिटी समिती सदस्य म्हणूनही ते काम पाहत आहेत. यातून रस्ते सुधारणा, अतिक्रमणे हटाव, स्वच्छता मोहीम यात ते पुढाकाराने सहभाग घेतात.

त्यांच्या या कार्याची दखल घेत १९९० ते २००८ पर्यंत महाराष्ट्र शासनाकडून विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांना नियुक्ती मिळाली आहे. त्यांच्या सामाजिक संवेदनशीलतेतून अनेक लोकांशी त्यांचे प्रेमाचे ऋणानुबंध जुळल्या गेले आहे आणि त्यांच्या हातून सहजगत्या घडत गेलेल्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याशिवाय सोलापूरच्या माध्यमांतून त्यांना आयकॉन ऑफ महाराष्ट्र म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. पण त्यांच्या आयुष्यात नेहमीच प्रेरणास्थान राहिलेले महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने मिळालेल्या पुरस्काराने ते विशेष आनंदित होतात.

त्यांना भविष्यातील त्यांच्या योजनांबद्दल विचारले असता त्यांनी सांगितले की गरजू बालकांसाठी ह्यूमन मिल्क बँक ते लवकरच स्थापित करणार आहेत. या प्रकल्पासाठी त्यांनी पूर्वनियोजन, तयारी व अभ्यासातून स्वित्झर्लंडच्या कंपनीशी करार केला असून पन्नास लाखाचा निधी ते रोटरी क्लबच्या माध्यमातून उभा करणार आहे.

सामाजिक दातृत्व आणि त्यासाठी लागणारे नेतृत्व या माध्यमातून त्यांचे समाजसेवेचे काम असेच अखंड सुरू राहो आणि गरजू, वंचितांना त्यांच्या सामाजिक कायार्तून अधिकाधिक लाभ मिळो यासाठी आमच्या शुभेच्छा...

**सुनील दावडा संपर्क क्रमांक 9822072225**

# आमचा नोटा नकाराधिकार नाकारणारे तुम्ही कोण?

सध्या महाराष्ट्रात नगर पालिका आणि महापालिका निवडणुकांचा ज्वर उतरता उतरेना. डिसेंबर मध्ये नगर पालिका निवडणुकांचा गुंगारा (एनेस्थेशिया) उतरत नाही तोच महानगर पालिका निवडणूकांच्या गुंगीत मतदार गेलेत.

गुंगारा यासाठी शब्द वापरला की या निवडणुकांत ऐकावे ते नवल.. किंवा घडू नये ते घडले... किंवा अशक्य ते शक्य करतील स्वामी.... ही वाक्य किंवा वचने आठवू लागली. घडलेल्या घटनाकडे जनता तटस्थ, चौकोनी चेहऱ्याने आणि निष्क्रिय भावाने पाहताना दिसते.




प्रा. दिलीप जोशी
वाशिम.
९८२२२६२७३५

पक्षांतर, कोलांटउड्या, तत्वहीनता, मते विकत घेणे ह्या बाबी नैसर्गिक झाल्या. मतदारांच्या भावना बोथट झाल्या. हे चालतच असते म्हणून माणसांकडून प्रतिक्रिया देखिल येईनाशी झाली. रोज सूर्य उगवतो आणि मावळतो तसेच या सर्व घटना वाटतात आपल्याला. रोजचेच झाले म्हणून संवेदना शून्य झालोत आपण. या सर्वात अधिक भर पडली तो बिनविरोध निवडून येण्याची.

गत डिसेंबर मध्ये झालेल्या निवडणुकीत पेन, शिर्डी, परळी, बारामती, दोंडाई, जामनेर, चिखलदरा, राजगुरूनगर अशा जवळ जवळ एक डझन ठिकाणच्या ४ डझनच्या वर नगर सेवक आणि जवळ जवळ अर्धा डझन नगराध्यक्ष बिनविरोध निवडून आलेत.

आता जानेवारी २०२६ मध्ये होऊ घातलेल्या महानगरपालिकेत कल्याण डोंबिवली, ठाणे, पनवेल, भिवंडी, धुळे, अहिल्यानगर, जळगाव, पुणे, मालेगाव अशा काही महापालिकेत जवळ जवळ सहा डझन उमेदवार अविरोध निवडून आलेत.

अविरोध निवडून येणे हा काही गुन्हा नाही किंवा अशी निवड घटनाबाह्य देखिल नाही.

मला कायद्याचे तितके ज्ञान नक्कीच नाही. पण तरीही मला एक प्रश्न वारंवार सतावतोय तो म्हणजे मतदान यंत्रावर उमेदवारांची नावे असतात आणि सर्वात शेवटी एक नोटाचे बटण असते. मतदारांना दिलेला हा नकाराधिकार आहे.

ज्या अर्थी निवडणूक आयोगाने हे बटण मतदान यंत्रावर दिले त्या अर्थी ते संविधान संमत आहे. दिलेल्या उमेदवारांपैकी एकही पसंत नसेल, लायकीचा वाटत नसेल तर मतदार आपला नकाराधिकार वापरू शकतो.जर नोटाला अधिक मते पडली तर नोटा जिंकला असा त्याचा अर्थ होतो.

नोटा जिंकला तर तिथे पुन्हा निवड करण्याची प्रक्रिया राबवणे क्रमप्राप्त ठरते. असा प्रसंग आजपर्यंत कुठे आला असे ऐकिवात नसले तरी कायद्याने ही ठरवून दिलेली बाब आहे. थोडक्यात म्हणजे उभे असलेल्या उमेदवारात नोटा देखिल एक उमेदवारच समजल्या जातो. अजून सोप्या भाषेत सांगायचे तर नोटा विरुद्ध उमेदवार असा तो सामना असतो. त्यात नोटा जिंकूही शकतो.

आता जिथे बाकी सर्व उमेदवारांनी आपल्या उमेदवाऱ्या मागे घेतल्या आणि केवळ एकच उमेदवार बाकी आहे त्याठिकाणी निवडणूक आयोगाने त्यांना निवडणूक होण्याआधी निकाल लावून अविरोध घोषित केले.

मग आमच्या नोटा म्हणजे नकाराधिकाराचे काय? असा प्रश्न शिल्लक उरतोच की? नोटा नावाचा आमचा उमेदवार प्रत्येक निवडणुकीत ताकदीने उभा असतो. तो ना प्रलोभनाने,ना धाकाने माघार घेतो. तो कायम उभा असतो.

मग एखाद्या उमेदवाराला अविरोध घोषित करून आमच्या संविधानाने दिलेल्या आमच्या नकाराधिकारावर गदा आणण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला दिला कोणी?

**नाहीतर नोटाला वांझोटा घोषित करा**

उमेदवार एक असो की अनेक ? आमचा नकाराधिकार कायम आहे.तो हक्क आम्हाला संविधानाने दिला आहे. तो आमचा हक्क आम्हाला बजावू दिला पाहिजे.

त्यामुळे बिनविरोध ही संकल्पना सर्वच पक्षांचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने त्यांना गोड वाटत असेलही कदाचित पण लोकशाहीला अविरोध ही घोषणा घातक आहे, असे माझे स्पष्ट मत आहे.

जो उमेदवार अविरोध आला त्याने जबरदस्ती, धाक दाखवून, प्रलोभने देवून,वाममागार्चा वापर करून तो अविरोध आला असे माझे अजिबात मत नाही. हा संशोधनाचा विषय असला तरी सकारात्मक विचार आपण करू की तो विधायक मार्गानेच अविरोध झाला.

तो अविरोध झाला कारण ज्या पाच दहा लोकांनी उमेदवारी अर्ज भरले त्यांनी भरलेले अर्ज मागे घेतले म्हणून. त्या पाच दहाच्या मतांवर लोकप्रतिनिधी ठरविणे जनतेवर अन्याय होईल.

अविरोध आलेला जनतेला नको असेल तर तो जनमताचा अनादर होईल. त्यामुळे आपला योग्य प्रतिनिधी निवडण्याची जनतेला पुन्हा संधी देणे हे सुदृढ लोकशाहीसाठी गरजेचे आहे.

नोटा हा पर्याय जो पर्यंत उपलब्ध आहे तो पर्यंत आमच्या नकाराधिकारावर कोणीही हातोडा फिरवू नये. ही माफक अपेक्षा मतदारांनी करणे अजिबात चुकीचे नाही.

तस्मात नोटा असेपर्यंत अविरोध संकल्पना हास्यास्पद ठरेल.

तूर्तास इतकेच !

# ज्येष्ठ पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ



भारतातील पर्यावरण विषयक जाणीव, उणीवा आणि विशेषतः पश्चिम घाटांमधील, जैवविविधतेबाबत संवेदना संजीवित करण्याचा प्रयत्न करणारे; जेष्ठ पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांचे बुधवारी पुण्यात निधन झाले. देशाच्या पश्चिम घाटामध्ये राबवल्या जाणाऱ्या विकासकामांमुळे घाटातील सजीवसृष्टी आणि एकंदरीत ढासत्या पर्यावरणाच्या समतोलावर मोठे संकट निर्माण होऊ शकते, असा धोक्यांचा इशारा सर्वप्रथम डॉ. माधव गाडगीळांनी मांडला होता. पर्यावरणासाठी सखोल चिंतन, अध्ययन, विश्लेषण करणाऱ्यांपैकी डॉ. माधव गाडगीळांचे कार्य अग्रणी आहे.

२०२१ साली डॉ. माधव गाडगीळांनी पूर, ढगफुटीसारख्या नैसर्गिक आपत्तीबद्दल सूचना आणि महत्त्वपूर्ण भाष्य केले होते. त्यांचे पुढील भाष्य भविष्यासाठी सदैव चिंतनीय ठरेल. पश्चिम घाटामध्ये हे काही पहिल्यांदाच घडत नाही. इथे गेल्या काही वर्षांपासून अद्भुत घटना घडतआल्या आहेत. हिमालयात आपण गेल्या दहा वर्षात अशा प्रकारच्या पुराच्या घटना पाहिल्या आहेत.

१९७८ साली उत्तराखंडमध्ये झालेले 'चिपको आंदोलन' हेच मुळात अलकनंदामध्ये वृक्षतोड व डोंगराचे उतार फोडल्यामुळे उद्भवले आहेत. ते पुर परिस्थितीचा निषेध म्हणून सुरू झाले होते. पुढे वर्षानुवर्षे हे प्रकार वाढतच गेले आहेत.

हिमालयाची रचना ही भारतीय व युरेशियन प्लेट्सची धडक झाल्यानंतर अरवली पर्वतरांगात रूपांतरित तयार झाली आहे. तिथली जमीन भूस्लखन आणि दरड कोसळण्याच्या घटनांसाठी अधिक संवेदनशील आहे.यावर पश्चिम घाटांमधील पर्वतरांगा या ज्वालामुखींच्या उद्रेकातून तयार झालेल्या खडकांमुळे अस्तित्वात आल्या आहेत. अशा शब्दात डॉ. गाडगीळांनी विश्लेषण केले होते.

केरळ, कर्नाटक, महाराष्ट्र, गोवा, तामिळनाडू आणि गुजरात या सहा राज्यातील सुमारे १.६४ लाख चौरस किलोमीटर क्षेत्र व्यापणारा पश्चिम घाट हा देशातील जैवविविधतेचा कणा मानला जातो. गेल्या काही दशकात या भागात बेसुमार खाणकामे,धरणे, औद्योगीकरण आणि अनियंत्रित बांधकामामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला असल्याचा अहवाल माधव गाडगीळांचा होता.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९९३०८३५४५८

हा अहवाल २०११ मध्ये केंद्र सरकारकडे सादर केला होता. तो अनेक अंगाने चर्चित राहिला. 'गाडगीळ अहवाल' पश्चिम घाटांचे पर्यावरणीय, संवेदनशीलरित्या स्तरीय वर्गीकरण केले होते. या भागात खाणकाम, मोठे जलविद्युत प्रकल्प, थर्मल पॉवर प्रकल्प आणि प्रदूषणकारी उद्योगांवर पूर्ण बंदी घालण्याची ही शिफारस केली होती. तर वर्गीकृत नियंत्रित विकास कामाला मुभा देण्याची भूमिका 'माधव गाडगीळ' अहवालात त्यांनी मांडली होती. आज ही पश्चिम घाटांच्या भवितव्याविषयी सुरू असलेल्या चर्चेत गाडगीळांच्या अहवालाचा संदर्भ महत्त्वाचा ठरतो.

डॉ. माधव गाडगीळ पुण्यात स्थायिक होते. त्यांचा जन्म २५ मे १९४२ ला पुण्यात झाला. ते पेशाने जीवशास्त्रज्ञ होते. त्यांचे उच्च शिक्षण पुणे, मुंबई आणि हॉवर्ड विद्यापीठात झाले. बेंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे प्राध्यापक असताना, विद्यार्थ्यांत पर्यावरण संरक्षणाची जागृती निर्माण व्हावी, यासाठी देशातील जैवविविधतेचे सर्वेक्षण आणि संवर्धन या विषयावर अनेक अभिनव प्रयोग सुद्धा केले होते.

पर्यावरणीय संशोधना सोबतच, त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. तर अनेक सहकारी समितीचे अध्यक्षही ते राहिलेत. तसेच १९९८ ते २००१ या काळात जागतिक पर्यावरण समितीचे सभासद होते. अमेरिका राष्ट्रीय विकास प्रबोधिनीचे विदेशातील सदस्यही ते राहिले. १९८६ ते ९०या काळात भारताच्या पंतप्रधान विकास व तंत्रज्ञान मंडळाचे सदस्य पद ही त्यांनी भूषविले. विविध राज्याचे पुरस्कार त्यांना मिळालेत.

आंतरराष्ट्रीय पुरस्कारात सदर्न कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी चा टायलर पुरस्काराचे ते मानकरी झालेत. संयुक्त राष्ट्रसंघातर्फे दिला जाणारा, सर्वोच्च पुरस्कार 'चॅम्पियन ऑफ द अर्थ 'हा २०२४ ला प्रदान करण्यात आला होता.

भारत सरकार तर्फे त्यांना पद्मश्री आणि पद्मविभूषण पुरस्काराने सुद्धा सन्मानित करण्यात आले आहे.

त्यांनी आपल्या आयुष्याची सहा दशके पर्यावरण संरक्षणासाठी झटलीत. ते स्वतःला 'जनतेचे वैज्ञानिक' मानायचे. असा हा पर्यावरणतज्ञ जैवविविधतेसाठी संघर्ष करणारा योद्धा, वयाच्या ८४ व्या वर्षी काळाने हिरावून घेतला, ही सुद्धा एक पर्यावरणाची हानीच मानावी लागेल!

# जागतिक हिंदी दिनः भारतीय संस्कृतीचा जागतिक वारसा

**वाचक लिहितात**

दरवर्षी १० जानेवारी हा दिवस जगभरात 'जागतिक हिंदी दिन' म्हणून उत्साहात साजरा केला जातो. भारताची संस्कृती, परंपरा आणि विचार जागतिक स्तरावर पोहोचवण्यात हिंदी भाषेचा मोलाचा वाटा आहे.

हा दिवस साजरा करण्यामागे हिंदी भाषेचा जगभरात प्रचार आणि प्रसार करणे हा मुख्य उद्देश आहे.

पहिल्या जागतिक हिंदी संमेलनाचे आयोजन १० जानेवारी १९७५ रोजी नागपूर येथे करण्यात आले होते. या ऐतिहासिक घटनेची आठवण म्हणून २००६ मध्ये तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी १० जानेवारी हा दिवस 'जागतिक हिंदी दिन' म्हणून घोषित केला. तेव्हापासून परदेशातील भारतीय दूतावास आणि शैक्षणिक संस्थांमध्ये हा दिवस मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. १४ सप्टेंबर हा भारतापुरता मर्यादित आहे, तर १० जानेवारी हा जागतिक स्तरावर साजरा होतो. आज हिंदी ही केवळ भारताची भाषा राहिलेली नाही, तर ती एक जागतिक भाषा बनली आहे. जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांच्या यादीत हिंदी तिसऱ्या क्रमांकावर आहे. इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या काळात हिंदी भाषेचा वापर झपाट्याने वाढत आहे. चित्रपटसृष्टी आणि हिंदी साहित्यामुळे फिजी, मॉरिशस, गयाना, सुरिनाम आणि नेपाळ यांसारख्या देशांमध्ये हिंदी मोठ्या आवडीने बोलली आणि समजली जाते.

या दिवशी शाळा, महाविद्यालये आणि सरकारी कार्यालयांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

कोणतीही भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसते, तर ती त्या देशाची ओळख असते. हिंदी भाषा ही भारतीयांना जोडणारा एक भक्कम दुवा आहे. 'वसुधैव कुटुंबकम' ही भारताची भावना जगापर्यंत पोहोचवण्यासाठी हिंदी हे एक प्रभावी माध्यम आहे. आपण सर्वांनी आपल्या मातृभाषेचा सन्मान राखत हिंदी या राष्ट्रभाषेचाही आदर करायला हवा.

भारताच्या सीमा ओलांडून हिंदी भाषा आता जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवत असून, ती केवळ संवादाचे माध्यम न राहता भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारसाची वाहक बनली आहे.

■ सौ.वर्षा आवदे
नागपूर.

# केस गळणं थांबेल खोबरेल तेलात मिक्स करा हे पदार्थ



आजकाल, बदलत्या जीवनशैली, ताणतणाव, अस्वास्थ्यकर खाण्याच्या सवयी आणि केमिकलचा अति वापर करून तयार केलेले उत्पादन यामुळे केस गळणे आणि कोंडा होणे खूप सामान्य झाले आहे.

लहान वयात केस गळणे, स्कॅल्पमध्ये कोरडेपणा व खाज सुटणे आणि कोंडा यासारख्या समस्या सतत सतावत असतात. तर यापासून सुटका मिळवण्यासाठी महागडे शाम्पू आणि उपचार करूनही योग्य परिणाम मिळत नाहीत. पण तुम्हाला माहित आहे का की तुमच्या स्वयंपाकघरात असलेली ही एक गोष्ट, खोबरेल तेलात मिक्स करून आणि योग्यरित्या वापरल्यास, केसांशी संबंधित अनेक समस्यांपासून आराम मिळू शकतो.

खोबरेल तेल शतकानुशतके केसांसाठी वापरले जात आहे. तसेच खोबरेल तेलात जर एक विशेष नैसर्गिक गोष्ट मिक्स करून वापरल्याने स्कॅल्पला पोषण मिळते. ज्यामुळे कोंडा कमी होऊ शकतो आणि केस गळतीची समस्या कमी होते.

**हे पदार्थ खोबरेल तेलात मिक्स करा**

खोबरेल तेलात कापूर मिक्स करून लावल्याने केसांच्या समस्येपासून आराम मिळतो. कारण केसांसाठी खूप फायदेशीर मानले जाते. केस लांब, जाड आणि मजबूत बनवण्यास मदत होते.

त्यात अँटी-फंगल आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म आहेत, जे खाज सुटणे, जळजळ होणे आणि कोंडा कमी करण्यास मदत करतात. तसेच हे तेल लावल्याने रक्ताभिसरण देखील वाढवते, केसांची मुळे मजबूत होतात आणि केस गळतीवर लक्षणीय नियंत्रण ठेवते. तथापि हे तेल लावण्यापूर्वी पॅच टेस्ट करणे आवश्यक आहे.

**अशा पद्धतीने बनवा हेअर ऑईल**

केसांच्या बहुतेक समस्या दूर करण्यासाठी तुम्ही खोबरेल तेलात कापूर मिक्स करून लावू शकता. हे केसांचे तेल बनवण्यासाठी, तुम्हाला २.५ चमचे खोबरेल तेल लागेल, त्यात थोडे कापूर (१/४ चमचे किंवा १ छोटी गोळी) पावडर मिक्स करा आणि तेल थोडं गरम करा. थंड झाल्यावर ते तुमच्या स्कॅल्पवर हलक्या हाताने मसाज करा. ३० ते ६० मिनिटे किंवा रात्रभर तसेच राहू द्या आणि नंतर सौम्य शाम्पूने केस धुवा.

**खोबरेल तेला कांद्याचा रस मिक्स करून लावणे उत्तम**

कांद्याचा रस केसांसाठी वरदान मानले जातात. कांद्यामधील सल्फरचे प्रमाण कोलेजनचे उत्पादन वाढवते, ज्यामुळे केस गळणे कमी होते आणि केसांची वाढ सुधारते. २-३ चमचे खोबरेल तेल घ्या. त्यात १-२ चमचे कांद्याचा रस मिक्स करा आणि स्कॅल्पला मसाज करा. कांद्याचा रस लावत असाल तर ते रात्रभर तसेच राहू देऊ नका. आंघोळीच्या एक तास आधी हे तेल लावा आणि नंतर शॅम्पूने केस स्वच्छ धुवा.

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### कुत्र्यांची दहशत..!

शहर असो की खेडे
माणसे लागली भ्यायला
कारण मोकाट श्वानांचे कळप
लागलेत अंगावर यायला ..!

मोकाट कुत्र्यांची दहशत
मार्गस्त असता नस्ती आफत
आकस्मिक घेती चावा
माणूस म्हणतो वाचवा धावा ..

समस्या बनलीय गंभीर
शासनाने व्हावे खंबीर
संरक्षण जनतेच्या जिवित्वाचे
हेच सर्वात महत्वाचे ..!

## : महानगरपालिका निवडणूक :

# शहराचा विकास की सत्तेचा खेळ?



प्रा. डॉ. प्रशांत विघे
राज्यशास्त्र विषयाचे लेखक
भारतीय महाविद्यालय,
अमरावती.
९३२६८७७७४९

भारतीय लोकशाहीची खरी ताकद जर कुठे दिसत असेल, तर ती संसदेत किंवा विधानसभेत नव्हे, तर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिसते.

ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका या संस्था केवळ प्रशासकीय चौकटी नाहीत, तर त्या सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट जोडलेल्या लोकशाहीच्या प्रयोगशाळा आहेत. नागरिकाला दररोज ज्या प्रश्नांना सामोरे जावे लागते. त्या पाणी, रस्ते, कचरा, आरोग्य, शिक्षण, वाहतूक याची उत्तरे याच संस्थांमध्ये मिळायला हवीत.

मात्र, महाराष्ट्रात १५ जानेवारी २०२६ रोजी होऊ घातलेल्या महानगरपालिका निवडणुकांकडे पाहिले, तर एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा राहतो. तो म्हणजे निवडणुका आपल्या शहरांच्या विकासासाठी आहेत की, राज्य व केंद्रातील राजकीय ताकद मोजण्यासाठी? ही निवडणूक शहराचे भविष्य ठरवणारी आहे की, सत्ताधाऱ्यांच्या अहंकाराची लढाई?

**स्थानिक निवडणूक, पण मुद्दे राष्ट्रीय !**

महानगरपालिका निवडणुकीचा केंद्रबिंदू स्पष्ट असायला हवा , पाणीपुरवठा, रस्त्यांची अवस्था, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था, शाळा, वाहतूक नियोजन, पर्यावरण संरक्षण आणि झोपडपट्टी पुनर्वसन करायचे आहे का?

पण प्रत्यक्षात प्रचारात काय ऐकू येते? राष्ट्रीय सुरक्षा, धर्म, देशद्रोह, केंद्र-राज्य संघर्ष, नेतृत्वाचे गुणगान! हा विरोधाभास केवळ दुर्दैवी नाही, तर लोकशाहीच्या मूळ संकल्पनेलाच छेद देणारा आहे. कारण शहरातील खड्ड्यांचा प्रश्न संसदेत सुटत नाही, पाणीटंचाई दिल्लीतील भाषणांनी मिटत नाही, आणि आरोग्य व्यवस्था केंद्रातील घोषणांनी सुधारत नाही.

तरीही जाणीवपूर्वक स्थानिक प्रश्न बाजूला सारून भावनिक, वैचारिक आणि राष्ट्रीय मुद्द्यांचे भांडवल केले जाते. कारण स्थानिक विकासावर प्रश्न विचारले, तर अपयश उघडे पडते; पण राष्ट्रवाद किंवा धर्माची भाषा वापरली की प्रश्न विचारणारेच संशयाच्या भोवऱ्यात अडकतात.

राज्याच्या राजकारणाची महानगरपालिकांवर सावली आज महाराष्ट्रातील राज्य राजकारण हे सत्ताकेंद्रित, सूडबुद्धीचे आणि निधी आधारित बनले आहे.

या राजकारणाचा सर्वात मोठा फटका महानगरपालिकांना बसत आहे. खुले आम सांगितले जाते, आम्हाला सत्ता दिली तरच केंद्रातून निधी मिळेल. हा इशारा नाही, तर थेट धमकी आहे.

निधी हा कुठल्या पक्षाची मालमत्ता नाही. तो नागपूरमधील कामगाराचा, पुण्यातील मध्यमवर्गीयाचा, अमरावतीतील शिक्षकाचा आणि छत्रपती संभाजीनगरमधील सामान्य नागरिकाचा कराचा पैसा आहे. तो पैसा पक्षनिष्ठेवर वाटला जात असेल, तर ती लोकशाही नसून राजकीय ब्लॅकमेल आहे.

विकासाचा अधिकार की सत्तेचे बक्षीस? लोकशाहीत विकास हा नागरिकांचा अधिकार असतो. पण आज तो सत्ताधाऱ्यांचे बक्षीस बनवला जात आहे. तुम्ही आमच्या पक्षाला मत दिले, तर निधी. नाही दिले, तर शहराची गळचेपी केली जाईल. हे धोरण लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारे आहे. कारण लोकशाहीत सत्ता जनतेकडून घाबरते; जनता सत्तेकडून नाही.

**महानगरपालिका : लोकांची संस्था की पक्षाची शाखा?**

भारतीय संविधानाच्या ७४व्या घटनादुरुस्तीने महानगरपालिकांना स्वायत्त व लोकाभिमुख बनवण्याचा उद्देश होता, परंतु आज अनेक महानगरपालिका राजकीय पक्षांच्या शाखा बनल्याचे दिसते.

नगरसेवकांचा पहिला विचार शहराचा नसून पक्षाच्या आदेशाचा असतो, त्यामुळे नागरिकांच्या समस्या दुय्यम ठरतात. याचे दुष्परिणाम स्पष्ट आहेत...नागपूरमध्ये अपुरे नियोजन, पुण्यात अनियंत्रित शहरीकरण, अमरावतीत मूलभूत सुविधांचा अभाव आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये कागदावरच मर्यादित प्रकल्प. शहराच्या गरजांपेक्षा सत्तेच्या गणिताला प्राधान्य दिले जात असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांचा लोकशाही आत्मा हळूहळू कमजोर होत चालला आहे.

**मतदार गुलाम की प्रश्न विचारणारा नागरिक?**

लोकशाहीत मतदार हा देव्हाऱ्यात ठेवायचा फोटो नाही; तो प्रश्न विचारणारा नागरिक असतो. पण आज मतदाराला भावनिक घोषणांमध्ये अडकवले जाते.

मतदारांनी थांबून विचारले पाहिजे, गेल्या पाच वर्षांत आपल्या शहरात काय बदल झाला? पाणी, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता यावर किती खर्च झाला? नगरसेवक आपल्यात राहतो की, निवडणुकीपुरताच दिसतो? शहराच्या प्रश्नांसाठी तो लढतो की फक्त पक्षाचे पोस्टर लावतो? हे प्रश्न विचारले गेले नाहीत, तर महानगरपालिका निवडणूक ही लोकशाहीचा उत्सव न राहता राजकीय तमाशा बनेल.

**नागपूर, पुणे, अमरावती, छ. संभाजीनगर : एकच प्रश्न**

शहरे वेगळी असली तरी प्रश्न एकच आहे .आपण शहरासाठी मतदान करणार आहोत की सत्तेसाठी? जर नागपूरचा विकास पक्षनिष्ठेवर ठरवला गेला, जर पुण्याचा निधी केंद्र, राज्य संघर्षात अडकला, जर अमरावतीला राजकीय दुर्लक्ष सहन करावे लागले, जर छत्रपती संभाजीनगर केवळ घोषणांपुरतेच मर्यादित राहिले, तर ही शहरे नव्हे, तर लोकशाही हरलेली असेल.

लोकशाहीसाठी धोक्याची घंटा महानगरपालिका निवडणुका जर राष्ट्रीय राजकारणाच्या सावलीत गेल्या, निधीच्या धमक्यांवर चालल्या आणि स्थानिक प्रश्न दुय्यम ठरले, तर ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. कारण स्थानिक लोकशाही कमजोर झाली, तर राज्य आणि राष्ट्रही कमजोर होतात हे विसरून चालणार नाही.

थोडक्यात एवढेच म्हणता येईल की, महानगरपालिका ही लोकांच्या विकासासाठी असावी. परंतु ती जर पक्षाच्या आदेशांवर चालणारी संस्था बनली, तर शहराचा विकास खुंटतो आणि लोकशाहीचा आत्मा दुर्बल होतो. म्हणूनच शहरासाठी मतदान करा, सत्तेसाठी नव्हे.

१५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या महानगरपालिका निवडणुका हा सत्तेचा खेळ नसून लोकशाहीचा कसोटीक्षण आहे. ही निवडणूक दिल्लीसाठी नाही, मुंबईसाठी नाही, कोणत्याही पक्षासाठी नाही; ती आपल्या शहराच्या विकासासाठी आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था मजबूत झाल्याशिवाय राष्ट्रही मजबूत होऊ शकत नाही. स्थानिक स्वराज्य बळकट करायचे असेल, तर राष्ट्रीय राजकारणाचा अतिरेक थांबवून शहराच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवणे अपरिहार्य आहे. अन्यथा विकासाच्या नावाखाली सत्तेचे राजकारण आणि लोकशाहीची अवहेलना हीच महाराष्ट्रातील महानगरपालिकांची ओळख ठरेल, हे मात्र निश्चित आहे.

# गरिबीविरुद्ध लढा : मानवी वेदनांपासून सामाजिक न्यायापर्यंतचा संघर्ष





डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5
@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

मानवी इतिहासात विविध संस्कृती, राज्यव्यवस्था आणि आर्थिक पद्धती उदयास आल्या, नष्ट झाल्या; परंतु गरिबी हा प्रश्न मात्र प्रत्येक काळात वेगवेगळ्या स्वरूपात टिकून राहिलेला दिसतो.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आणि प्रगतीच्या घोषणांमध्येही गरिबीचे अस्तित्व आजही वास्तव आहे. ०८ जानेवारी रोजी साजरा झालेला गरिबीविरुद्ध लढा दिन हा केवळ एखाद्या सामाजिक घटनेची आठवण करून देणारा दिवस नसून, तो समाजाच्या अंतःकरणाला प्रश्न विचारणारा आणि विकासाच्या संकल्पनेला पुन्हा तपासण्यास भाग पाडणारा दिवस आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, गरिबी ही केवळ पैशाच्या अभावाची समस्या नसून, ती मानवी प्रतिष्ठा, सामाजिक संधी, समानता आणि न्याय यांच्याशी निगडित असलेली एक खोल सामाजिक समस्या आहे.

गरिबीचा विचार करताना समाजशास्त्र तिच्याकडे एक बहुआयामी सामाजिक वास्तव म्हणून पाहते. गरिबी म्हणजे केवळ दोन वेळचे अन्न न मिळणे नाही; तर शिक्षण, आरोग्य, सुरक्षित निवारा, सन्मानजनक रोजगार, सामाजिक संरक्षण, आणि समाजातील निर्णयप्रक्रियेत सहभाग यांपासून वंचित राहणे होय.

अनेक वेळा एखादी व्यक्ती गरीब असण्याचे कारण तिच्या वैयक्तिक क्षमतेपेक्षा ती ज्या सामाजिक रचनेत जन्माला येते, त्या रचनेतील असमानता असते. जात, वर्ग, लिंग, धर्म, प्रदेश आणि शिक्षण या घटकांवर आधारित भेदभावामुळे समाजातील काही गट कायमस्वरूपी गरिबीच्या कडेलोटावर उभे राहतात. म्हणूनच गरिबी ही वैयक्तिक अपयश नसून, ती सामाजिक व्यवस्थेतील अन्यायाचे प्रतिबिंब आहे.

भारतीय समाजाच्या संदर्भात गरिबीचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे आणि बहुआयामी आहे. भारतात आर्थिक विकासाच्या अनेक योजना राबविल्या गेल्या, औद्योगिकीकरण झाले, शहरीकरण वाढले आणि सेवा क्षेत्र विस्तारले; मात्र या विकासाचा लाभ सर्वसामान्य माणसापर्यंत समान प्रमाणात पोहोचलेला नाही.

ग्रामीण भागात आजही शेतीवर अवलंबून असलेली कुटुंबे हवामानातील अनिश्चितता, उत्पादन खर्च, बाजारातील अस्थिरता आणि कर्जबाजारीपणामुळे गरिबीत अडकलेली आहेत.

दुसरीकडे शहरी भागात रोजगाराच्या संधी असल्या, तरी झोपडपट्ट्यांमधील जीवन, अपुऱ्या मूलभूत सुविधा, असुरक्षित कामकाज आणि सामाजिक संरक्षणाचा अभाव यामुळे शहरी गरिबीचे वेगळेच भयावह स्वरूप दिसून येते. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे स्पष्ट होते की गरिबी ही ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही पातळ्यांवर सामाजिक विकासाला मोठे आव्हान ठरते.

गरिबीचा सर्वाधिक फटका समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांना बसतो. अनुसूचित जाती-जमाती, भटक्या-विमुक्त जमाती, अल्पसंख्याक समुदाय, महिला, अपंग व्यक्ती आणि स्थलांतरित कामगार हे घटक सामाजिक व आर्थिक दोन्ही स्तरांवर असुरक्षित असतात.

विशेषतः महिलांच्या बाबतीत गरिबीचे स्वरूप अधिक तीव्र असते. शिक्षणाच्या संधींचा अभाव, रोजगारातील भेदभाव, कमी मजुरी, असुरक्षित कामकाज आणि घरगुती जबाबदाऱ्यांचा भार यामुळे महिला दुहेरी शोषणाचा सामना करतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून असे दिसते की महिलांचे सक्षमीकरण केल्याशिवाय गरिबीविरुद्धचा लढा यशस्वी होऊ शकत नाही.

गरिबीविरुद्ध लढा दिनाचे महत्त्व यासाठी अधोरेखित करावे लागते की हा दिवस समाजाला आत्मपरीक्षणाची संधी देतो. विकासाचा अर्थ नेमका काय, हा प्रश्न हा दिवस उपस्थित करतो. केवळ राष्ट्रीय उत्पन्न वाढणे, मोठे प्रकल्प उभे राहणे किंवा आकडेवारीत सुधारणा होणे म्हणजे विकास नव्हे. खरा विकास तोच, ज्यामध्ये समाजातील शेवटच्या माणसाचे जीवनमान सुधारते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, ज्या समाजात संपत्ती काही मोजक्या लोकांकडे केंद्रीत होते आणि बहुसंख्य लोक मूलभूत गरजांसाठी संघर्ष करतात, तो समाज समतोल आणि न्याय्य ठरत नाही. म्हणून गरिबीविरुद्धचा लढा हा समतामूलक समाजनिर्मितीचा संघर्ष आहे.

शिक्षण हे गरिबीविरुद्धच्या लढ्यातील सर्वात प्रभावी साधन मानले जाते. शिक्षणामुळे व्यक्तीला रोजगाराच्या संधी मिळतात, सामाजिक जाणीव विकसित होते आणि आत्मविश्वास निर्माण होतो. पिढ्यान्पिढ्या चालत आलेली गरिबीची साखळी तोडण्याची ताकद शिक्षणात आहे.

मात्र गरीब कुटुंबांतील मुलांना शिक्षणापर्यंत पोहोचताना अनेक अडथळे येतात. आर्थिक अडचणी, बालमजुरी, शाळा सोडण्याचे प्रमाण, मुलींच्या शिक्षणाकडे होणारे दुर्लक्ष आणि डिजिटल साधनांचा अभाव यामुळे शिक्षणातील विषमता वाढते.

समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, शिक्षणव्यवस्थेतील ही विषमता दूर करणे हे गरिबी निर्मूलनासाठी अत्यावश्यक आहे.

आरोग्य आणि गरिबी यांचा संबंधही अतिशय घनिष्ठ आहे. गरीब कुटुंबांमध्ये आजारपण हे केवळ शारीरिक त्रासापुरते मर्यादित न राहता, ते आर्थिक संकटाचे कारण ठरते. उपचाराचा खर्च, काम करण्याची क्षमता कमी होणे आणि दीर्घकालीन आजार यांमुळे कुटुंब अधिक गरिबीत ढकलले जाते.

समाजशास्त्रीय अभ्यासातून हे स्पष्ट होते की सार्वत्रिक, सुलभ आणि परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध झाल्यास गरिबीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. म्हणून सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा बळकटीकरण हा गरिबी विरुद्धच्या लढ्यातील महत्त्वाचा घटक आहे.

रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा गरिबीविरुद्धच्या संघर्षाचा केंद्रबिंदू आहे. बेरोजगारी आणि अल्परोजगारी ही गरिबीची प्रमुख कारणे आहेत. विशेषतः असंघटित क्षेत्रातील कामगारांना कमी मजुरी, सामाजिक सुरक्षा नसणे आणि रोजगाराची अनिश्चितता यांचा सामना करावा लागतो.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, केवळ रोजगारनिर्मिती पुरेशी नसून, सन्मानजनक, सुरक्षित आणि टिकाऊ रोजगार उपलब्ध होणे आवश्यक आहे. कौशल्यविकास, स्वयंरोजगार, सहकारी चळवळी आणि स्थानिक संसाधनांवर आधारित उद्योग यांमुळे आर्थिक स्वावलंबन वाढू शकते.

गरिबीविरुद्धच्या लढ्यात शासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अन्नसुरक्षा, रोजगार हमी, निवारा, सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक समावेशनाच्या योजना गरिबांसाठी आधारस्तंभ ठरू शकतात.

मात्र समाजशास्त्रीय अभ्यास सांगतो की योजनांचा प्रत्यक्ष लाभ गरजूंपर्यंत पोहोचण्यासाठी पारदर्शक अंमलबजावणी, प्रशासनाची संवेदनशीलता आणि लोकसहभाग अत्यावश्यक आहे. केवळ योजना जाहीर करणे पुरेसे नसून, त्या प्रभावीपणे राबविल्या गेल्या पाहिजेत.

स्वयंसेवी संस्था, सामाजिक चळवळी आणि स्थानिक समुदाय यांची भूमिका गरिबी निर्मूलनात अत्यंत मोलाची आहे. तळागाळातील गरजा ओळखून स्थानिक पातळीवर उपाययोजना राबविण्याची क्षमता या संस्थांकडे असते. महिला स्वयं-सहायता गट, ग्रामविकास उपक्रम, झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम आणि सामाजिक उद्योजकता यांमुळे अनेक कुटुंबांचे जीवनमान सुधारले आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे उपक्रम सामाजिक ऐक्य आणि सहभाग वाढवतात, जे दीर्घकालीन बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक आहे.

आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानालाही गरिबीविरुद्धच्या लढ्यात महत्त्वाचे स्थान आहे. डिजिटल सेवा, ऑनलाइन शिक्षण, थेट लाभ हस्तांतरण आणि माहितीपर पोहोच यांमुळे अनेक अडथळे कमी झाले आहेत. मात्र डिजिटल दरी ही नवीन सामाजिक विषमता निर्माण करत आहे. गरीब आणि वंचित घटकांना तंत्रज्ञानाचा समान लाभ मिळावा, यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत.

गरिबीविरुद्ध लढा दिन आपल्याला ठामपणे सांगतो की गरिबी निर्मूलन हा दयेचा नव्हे, तर हक्कांचा आणि न्यायाचा प्रश्न आहे. प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. अन्न, शिक्षण, आरोग्य, निवारा आणि रोजगार हे मूलभूत मानवी हक्क आहेत. जोपर्यंत समाजातील शेवटच्या घटकाचे जीवनमान उंचावत नाही, तोपर्यंत विकास अपूर्णच राहतो.

अखेरीस, ०८ जानेवारी, गरिबीविरुद्ध लढा दिन हा केवळ स्मरणाचा नव्हे, तर कृतीचा संकल्प करण्याचा दिवस आहे. गरिबी ही अटळ नियती नसून, ती मानवनिर्मित सामाजिक वास्तव आहे आणि त्यामुळे ती बदलण्याची ताकदही मानवाकडेच आहे.

सामाजिक संवेदनशीलता, समतामूलक धोरणे, लोकसहभाग आणि मानवी मूल्यांवर आधारित विकासाच्या मार्गानेच गरिबीवर मात करणे शक्य आहे. खऱ्या अर्थाने प्रगत समाज तोच, जिथे कोणतीही व्यक्ती उपेक्षित, वंचित किंवा दुर्लक्षित राहत नाही. गरिबीविरुद्धचा लढा हा एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता, तो आपल्या दैनंदिन सामाजिक जबाबदारीचा अविभाज्य भाग बनवणे, हीच या दिवसाची खरी सार्थकता आहे.

■ ■ ■

## : संतशिरोमणी दासगणू :

# उपदेश प्रकरणात शिष्यबोध व छात्रबोध!

(६-१३ जानेवारी : संत दासगणू महाराज जयंती उत्सव सप्ताह विशेष)



कृष्णकुमार आनंदी-
गोविंदा निकोडे
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
9423714883
nikodekrishnakumar@gmail.com

महत कल्याणकारी व जगाला वरदायी झालेल्या दासगणू महाराजांचे जीवन आपल्या सामान्य लोकांसाठी अमृत आहे. श्री साईबाबांचे कथामृत एकही कथा त्यांचे चरित्र सांगितल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. साईबाबांचे जीवनचरीत्र देशविदेशात पोहचविण्यासाठी त्यांचे अतुलनीय योगदान आहे. त्यांचे ग्रंथकार्य साई चरित्र, श्री गजाननविजय व इतर विस्तृत वाङ्मय पाहता दासगणू महाराजांची जयंती व पुण्यतिथी साजरी करणे, हे प्रत्येक साईभक्ताचे कर्तव्यच ठरते.

\-------------------------

दासगणू महाराज हे श्री साईबाबा यांचे परमभक्त होते. साईबाबांच्या स्फूर्तीनेच त्यांनी ओवीबद्ध रचना करण्यास सुरुवात केली. त्यांच्या अभंगस्वरूप लेखनात साईबाबांचा उल्लेख सतत येतो.

गणू म्हणे ही त्यांची नाममुद्रा होती. ते साईबाबांनाचा ब्रह्मा-विष्णू-महेशांच्या रूपात पाहत. दासगणू महाराज हेच साईबाबा संस्थानचे पहिले अध्यक्ष होते. त्यांच्या प्रमुख रचना व ग्रंथसंपदा अशा आहेत-

१) श्री आऊबाई चरित्र २) ईशावास्य भावार्थ बोधिनी ३) श्री गजानन विजयः या ग्रंथामधे श्री.गजानन महाराजांचे चरित्र त्यांनी लिहून ठेवले आहे. हे ग्रंथही महाराष्ट्रात खूप लोकप्रिय आहेत. ४) भक्त लीलामृत ५) भक्तिसारामृत ६) भाव दीपिका ७) शंकराचार्य चरित्र ८) संत कथामृत ९) श्री साईनाथ स्तवनमंजिरी १०) शिर्डी माझे पंढरपुर- साईबाबांची आरती.

इतर १०० स्फुटपदे, उपदेश प्रकरणात शिष्यबोध व छात्रबोध हे दोन ग्रंथ आहेत. याव्यतिरीक्त अमृतानुभव, शांडिल्य सुत्र, नारद भक्तीसुत्र, भक्ती रसायन, चांगदेव पासष्टी, ईशावास्य, विष्णु सहस्त्रनाम बोधिनी, गौडपाद कारिका विवरण, विचारसागर प्रदिप यासारखे टिकाग्रंथ व १२५ बोधकथाही लिहील्या आहेत.

गणेश दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे ऊर्फ दासगणू महाराज हे मराठी संत, कवी, ग्रंथकार व कीर्तनकार होते. त्यांनी मोठ्या प्रमाणात केलेल्या संत चरित्रलेखनामुळे त्यांना आधुनिक महाराष्ट्राचे महीपती म्हणून ओळखतात.

त्यांचा जन्म पौष शु.११ शके १७८९ म्हणजेच दि. ६ जानेवारी १८६८ रोजी अकोळनेर, ता.जि.अहमदनगर या गावी झाला. त्यांचा विवाह जामखेड तालुक्यात बोरले आष्टी येथील जहाँगिरदार नारायण रानडे यांची कन्या सरस्वती यांच्याशी सन १८९२मध्ये झाला.

सन १८९३ मध्ये ते पोलीस खात्यात भरती झाले आणि सन १९०४ पर्यंत ती नोकरी केली. ते पोलीसखात्यात नोकरीला असले तरी त्यांच्या ओढा मात्र परमार्थाकडेच होता. या दरम्यानच त्यांच्यावर त्या काळचा कुख्यात गुंड कान्हा भिल्ल याला पकडण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती.

जेव्हा त्या गुंडाला ही बातमी कळाली, तेव्हा त्याने महाराजांना जीवे मारण्याचे ठरविले. पण महाराज यातून सहीसलामत सुटले. तेव्हापासून त्यांची अशी धारणा झाली की ईश्वरानेच आपल्याला वाचविले. मग त्यांनी संपूर्ण जीवन ईश्वरचरणी अर्पण करण्याचे ठरविले.

त्यांचे पहिले कीर्तन इ.स. १८९७ साली जामखेडच्या श्रीविठ्ठल मंदिरात झाले. त्यांनी 'श्री साईनाथ स्तवनमंजिरी' या स्तोत्राची निर्मिती दि. ९ सप्टेंबर १९१८ रोजी मध्य प्रदेशातील श्री माहेश्वर या क्षेत्री साईबाबांचे महानिर्वाणाअगोदर ३७ दिवसांपूर्वी केली.

साईबाबा संस्थानची स्थापना सन १९२२साली झाली आणि पहिले अध्यक्ष म्हणून दासगणू महारांजाची निवड केली गेली. तेथून पुढे सन १९४५ पर्यंत त्यांनी अध्यक्षपद सांभाळले. श्री दासगणू महाराजांनी ईशावास्य उपनिषद भाषांतराचे कार्य सुरु केले आणि ते अडले या पहिल्याच श्लोकापाशी-

*ईशावास्यमिदं सर्वं यत्किंचीत जगत्यां जगत।*
*तेन त्यक्तेन भुञ्जिथा मा गृधः कस्यस्विद्वनम।।*

अर्थात- या चराचरात जे म्हणून काही आहे, म्हटल्याने दिसते, भासते, जाणवते ते सारे ईश्वराने व्यापलेले आहे. त्या सवार्चा त्यागपूर्वक भोग घ्यावा. दुसरी कोणतीही अपेक्षा ठेवू नये. महाराज त्यागपूर्वक भोग घ्यावा, या शब्दांपाशी अडले. त्यागाने भोग तरी कसे शक्य आहे? असे त्यांना वाटले.

भल्या भल्या विद्वानांशी चर्चा करूनही अर्थ उकलेना. शेवटी त्यांनी शिर्डी गाठली आणि श्री साईबाबांनाच प्रार्थना करून त्या श्लोकाचा अर्थ विचारला. त्यावर बाबा हसून म्हणाले, अरे हा अर्थ तर तुला काका दीक्षितच्या घरची मोलकरीण सांगेल!

श्री दासगणूनाच नव्हे तर हे उत्तर ऐकणाऱ्या सर्वांनाच आश्चर्य वाटले. त्या बिचारीचे शिक्षण ते किती? बुद्धी ती काय? ती उपनिषदांची अर्थ-व्युत्पत्ती कशी काय करणार?

मग दासगणू महाराज काकासाहेबांच्या घरी गेले. रात्री श्री साईबाबांविषयी गप्पा झाल्या. त्या स्मरण रंजणातच ते झोपी गेले. ते दिवाळीचे दिवस होते. पहाटेच त्यांना जाग आली ती कुणाच्या तरी मधुर गुणगुणण्याने!

आधीच दिवाळीची प्रसन्न पहाट त्यात हा सुश्राव्य स्वर!! दासगणू महाराज जाऊन बघतात, तो काय? भांडी घासण्यात दंग असलेली काकांची मोलकरीण गाणे गुणगुणत होती.

ती पोर अंगावर फाटके लुगडे नेसली होती आणि गात होती, नारिंगी रंगाच्या साडीची महती सांगणारे ते गाणे! त्या साडीची भरजरी नक्षी, तिचे काठ, तीचा पदर यांचे भरभरून वर्णन त्यात होते. दिवाळीच्या आनंदात माखलेल्या काकांच्या घरातल्या पोरीबाळी नव्या कपड्यात नटल्या होत्या. त्यांना पाहून फाटक्या कपड्यातली ती पोर उदासपणे नारिंगी साडीचे गोडवे गाणारे ते गाणे गुणगुणत होती.

महाराजांचे मन या दृष्याने हेलावले. ते काकांना म्हणाले, अहो काका, या पोरीला सुद्धा एखादी नवी साडी घेऊन द्या. काकासुद्धा मुळात उदार हृदयाचे त्यात महाराजांची विनंती! तेव्हा आनंदाने ते घरांत गेले. दिवाळीच्या खरेदी निमित्त कपाटात आणखीही काही नव्या साड्या होत्या.

त्यातली एक सुंदरशी साडी त्यांनी या पोरीला भेट म्हणून दिली. नवी साडी नेसून संध्याकाळी मैत्रिणींसोबत ती पोर फिरली आणि बागडली देखील.

दुसऱ्या दिवशी ती आली मात्र जुनी साडी नेसूनच. नवी साडी घरी ठेवून. पण चेहऱ्यावर कालची उदासीनता नावालाही नव्हती. उलट आनंद विलसत होता. काल अंगावर जुनी साडी आणि चेहऱ्यावर उदासीनता होती. आजही अंगावर जुनीच साडी, मात्र चेहऱ्यावर आनंद! तिचं हे रूप पाहताच दासगणू महाराजांच्या हृदयांतरी श्लोक निनादला..

*ईशावास्यमिदं सर्वं यत्किंचीत जगत्यां जगत।*
*तेन त्यक्तेन भुञ्जिथा मा गृधः कस्यस्विद्वनम।।*

या मोलकरणीच्या निमित्ताने महाराजांना त्यागपूर्वक भोगचा अर्थ उमगला. आज ती नवी साडी नेसली नव्हती तरी कालचे दैन्य ओसरले होते. ते केवळ भावना बदलल्याने! आज मनाने ती खिन्न नव्हती कारण साडीची उणीव नव्हती. प्रथम नवे लुगडे घ्यायला असमर्थ होती, म्हणून नाईलाजाने जुनेच लुगडे नेसून उदास होती. मग नवे लुगडे मिळाले, ते नेसण्यास समर्थ होती. तरीही जुनेच नेसायचे तिने मनाशी ठरवले, त्यामुळे ती मनाने उदास नव्हती.

समर्थ असूनही दैन्य मिरवीत होती. केवळ नाही नाही, आणि आहे नाही, या भावनांच्या गुणांनेच माणूस सुख आणि दुःख भोगतो. प्रत्यक्षात सुख आणि दुःखाचे मोजमाप बाह्यांगावरून करता येत नाही. सर्व जर काही एकाच ईश्वराने व्यापले आहे, तर त्यात सुख आणि दुःख आले कोठून? नवी साडी नसल्याची अपूर्णता दुःखाचे कारण होती. साडी लाभल्याची पूर्णता हे सुखाचे कारण बनले.

फरक बाह्यात पडला नाही, आंतरिक होता. थोडक्यात सुख आणि दुःख हे आंतरिक आहे. प्रत्यक्षात सारे काही पूर्णच आहे. फाटकी साडी नेसलेली ती पोर ईश्वराचेच अंश होते. दाता म्हणजे काका आणि त्यांनी दिलेले दानही ईश्वरी अंशच. मग सारे काही अशेषच!

ईश्वरावाचून वेगळे काहीच नाही. केवळ मी पणाने आंतरिक सुख-दुःख आहे. मीपणामुळे मी देणारा, मी घेणारा, मी अभावग्रस्त असा भाव आहे. प्रत्यक्षात दाता, देय, दान सारे काही ईश्वरी सत्तेतच सामावलेले आहे. अशा राज्य महीपती दासगणू महाराजांचे महानिर्वाण श्रीज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथीला- कार्तिक वद्य १३ शके १८८३ म्हणजेच दि. २६ नोव्हेंबर १९६२ रोजी पंढरपुरात झाले.

!! दासगणू महाराजांच्या जयंती सप्ताह निमित्ताने त्यांना विनम्र अभिवादन !!

# तेलसाठ्यासाठीच अमेरिकेची दंडेलशाही



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

इंधन तेलाने समृद्ध असलेल्या व्हेनेझुएला या देशावर अमेरिकेने हल्ला करून त्या देशाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो व त्यांच्या पत्नी सिलिया फ्लोरेस यांना जेरबंद करून अमेरिकेच्या तुरुंगात डांबले.

अमेरिका व्हेनेझुएलावर हल्ला करणार याची कुणकुण जगाला काही महिन्यापूर्वीच लागली होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे व्हेनेझुएलावर सातत्याने टीका करत होते. व्हेनेझुएलावर हल्ला केल्यानंतर ट्रम्प यांनी या हल्ल्यामागचे कारण सांगताना म्हणाले की, अमेरिकेत जी बेकायदेशीर ड्रग्स विक्री होत आहे त्याला व्हेनेझुएला जबाबदार आहे.

व्हेनेझुएला या देशातूनच अमेरिकेत बेकायदेशीर ड्रग्सचा पुरवठा होतो तो रोखण्यासाठी आम्ही हा हल्ला केला मात्र डोनाल्ड ट्रम्प यांचा हा दावा किती तकलादू आहे हे जगाला माहीत आहे. अमेरिकेने व्हेनेझुएलावर का हल्ला केला हे संपूर्ण जग जाणून आहे.

या हल्ल्यामागचे खरे कारण हे व्हेनेझुएलातील तेल हे आहे. व्हेनेझुएला हा जगातील चौथ्या क्रमांकाचा तेल उत्पादक देश आहे. अमेरिकेला व्हेनेझुएला मधील हे तेलसाठे हवे आहेत. हे तेलसाठे मिळवण्यासाठीच अमेरिकेने व्हेनेझुएलावर हल्ला केला.

अमेरिका स्वतःच्या स्वार्थासाठी आणि फायद्यासाठी कोणत्या थराला जाऊ शकते हे ट्रम्प यांनी या हल्ल्यातून दाखवून दिले आहे. ट्रम्प यांची ही दंडेलशाही निषेधार्हच आहे, संपूर्ण जगाने याचा निषेध करायला हवा. अमेरिकेने केलेले हे कृत्य संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदीमध्ये नमूद केलेल्या तत्त्वांचे उल्लंघन आहे.

अर्थात अमेरिकेने तेलासाठी किंवा स्वतःच्या फायद्यासाठी एखाद्या देशाची राखरांगोळी केल्याची ही पहिली वेळ नाही. स्वतःला जगाचे फौजदार समजून कोणत्याही देशावर हल्ला करायचा, तो देश नेस्तनाबूत करून तेथील तेलसाठे व खनिजे हस्तगत करायचे हे अमेरिकेचे धोरणच आहे. याआधीही त्यांनी अनेकदा असे केले आहे.

लिबिया या देशावर २०११ साली असाच हवाई हल्ला करून तेथील सत्ताधीश असलेल्या गद्दाफी यांची ४२ वषार्ची सत्ता संपुष्टात आणली होती. लिबिया हा आफ्रिकेतील सर्वात मोठा तेलसाठा असलेला देश होता. अमेरिकेला तो तेलसाठा हवा होता जोवर गद्दाफी सत्तेवर असतील तोवर त्यांना हा तेलसाठा मिळणार नव्हता म्हणून अमेरिकेने त्यांना हटवले त्यासाठी त्यांनी थेट त्या देशावर हवाई हल्ला केला. इराक हा असाच तेल साठ्याने समृद्ध असलेला देश.

या इराकमध्ये सद्दाम हुसेन यांची हुकूमशाही होती. सद्दाम हुसेन आपल्याला तेल देणार नाही हे अमेरिका जाणून होती. म्हणून मग इराकने घातक शस्त्रसाठा जमवला असून या शस्त्रांनी सपूर्ण जगाला धोका निर्माण झाला आहे अशी आवई अमेरिकेने उठवली, इराकने जमवलेली शस्त्रास्त्रे हस्तगत करायची आहेत असे सांगून इराकवर हल्ला केला आणि सद्दाम यांना फासावर लटकवले.

मात्र ज्या घातक शस्त्रांचे कारण सांगून अमेरिकेने इराकवर हल्ला केला ती घातक शस्त्रे अमेरिकेला मिळालीच नाही. मिळणार तरी कशी? कारण तशी घातक शस्त्रे इराकमध्ये नव्हतीच. अमेरिकेला मिळाले ते इराकमधील तेलसाठे. अमेरिकेने इराकमधील तेलसाठ्यासाठी सपूर्ण इराक बेचिराख करून टाकले होते.

१९८९ साली पनामा या छोट्या देशावर देखील अमेरिकेने अमली पदार्थांचा व्यापार चालू असल्याचा आरोप करून हल्ला केला होता. या हल्ल्यातही त्या देशाचे तत्कालीन राष्ट्रप्रमुख मॅन्युअल नोरियोगा यांना अटक करून ४० वर्षाची शिक्षा सुनावली होती. या हल्ल्यामागचे मुख्य कारण हे होते की पनामा कालवा हा जागतिक व्यापारासाठी महत्वाचा होता.

या कालव्यावर अमेरिकेला स्वतःचे नियंत्रण मिळवायचे होते. नोरियोगांना सत्तेवरून हटवल्या शिवाय अमेरिकेला पनामा कालव्यावर नियंत्रण मिळवणे अशक्य होते त्यासाठीच त्यांनी अवैध अमली पदार्थांची तस्करी केल्याचा आरोप ठेवून या देशावर हल्ला केला आणि पनामा कालव्यावर स्वतःचे नियंत्रण मिळवले.

व्हिएतनाम या देशावर देखील तेलसाठ्यासाठीच अमेरिकेने अनेकदा हल्ले केले. आताही अमेरिकेने त्याच कारणासाठी व्हेनेझुएलावर हल्ला केला. आता ते व्हेनेझुएलात स्वतःच्या मर्जीतील व्यक्तीला सत्तेवर बसवतील आणि त्याच्या माध्यमातून व्हेनेझुएलातील तेलसाठ्यावर नियंत्रण मिळवतील. अमेरिकेच्या व्हेनेझुएला वरील हल्ल्याने जगात भयंकर संदेश गेला आहे. आपल्याला मान्य नसलेल्या दुसऱ्या देशाच्या नेत्यांविरोधात अशी कारवाई करता येऊ शकते हे अमेरिकेने जगाला पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. भविष्यातही याची पुनरावृत्ती होऊ शकते म्हणूनच अमेरिकेच्या या दंडेलशाही विरुद्ध जगाने एकत्र यायला हवे. अमेरिकेच्या या दंडेलशाहीविरुद्ध आता संपूर्ण जगाने आवाज उठवायला हवा.

■ ■ ■

# व्हीआयपी मतदारसंघात मतदानावर बहिष्कार?

## एनआयटी व महापालिकेवर नागरिकांची नाराजी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण-पश्चिम मतदारसंघात समाविष्ट दर्शना को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या नागरिकांनी नागपूर महापालिका निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

येथील संतप्त नागरिकांनी सर्व घरांवर बहिष्काराचे फलक लावले आहेत. आमच्या समस्या सुटत नसतील, तर आम्ही मतदान करायचे तरी कसे? असा सवाल नागरिकांनी नागपूर महापालिका प्रशासनाला विचारला आहे.




नागपूरच्या दक्षिण-पश्चिम मतदारसंघातील दर्शना को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी ही प्रभाग क्रमांक ३४ मध्ये येते. ही सोसायटी मध्यमवर्गीय व सुशिक्षितांची कॉलनी म्हणून ओळखली जाते. येथील सर्व नागरिकांनी नागपूर महापालिका तसेच नागपूर सुधार प्रन्यास यांनी सोसायटीतील विविध कामांकडे केलेल्या दुर्लक्षामुळे मतदानावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे.

संतप्त नागरिकांच्या माहितीनुसार, हा भाग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघात येत असतानाही नागपूर महापालिकेकडून परिसरात नियमित स्वच्छता केली जात नाही. त्यामुळे नागरिकांना अस्वच्छ वातावरणात राहावे लागत आहे. येथे नियमितपणे कचरा उचलला जात नाही. परिणामी अनेक भागांत अस्वच्छता दिसून येते.

दर्शना को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी परिसरातील रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून ते महिनोमहिने दुरुस्त केले जात नाहीत. परिसरात योग्य प्रकाशव्यवस्था नाही. तसेच रिकाम्या प्लॉट्सवर नागपूर महापालिका आणि नागपूर सुधार प्रन्यास यांच्या दुर्लक्षामुळे अनधिकृत बांधकाम झाले आहे.

अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांचे धाडस इतके वाढले आहे की त्यांनी दर्शना को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या शासनमान्य रस्त्यांवरच बांधकाम करून रस्ते बंद केले आहेत. हे रस्ते मोकळे करण्यासाठीही कोणी पुढाकार घेत नाही. त्यामुळे येथील नागरिकांना नरकयातना भोगाव्या लागत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या गंभीर बाबीकडे येथील तत्कालीन नगरसेवकांचे वारंवार लक्ष वेधूनही त्यांनी दुर्लक्ष केल्याची तक्रारही नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# पेंच व्याघ्र प्रकल्पात मृतावस्थेत आढळले वाघिणीचे दोन बछडे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :



पेंच व्याघ्र प्रकल्पातील देवलापार वनपरिक्षेत्रात बुधवारी वाघाचे दोन बछडे मृतावस्थेत आढळले, यामुळे वन्यजीवतज्ज्ञ आणि स्थानिक प्रशासनात खळबळ उडाली आहे.

देशातील नामांकित व्याघ्र अधिवासांपैकी एक असलेल्या पेंचमध्ये घडलेल्या या दुर्मिळ घटनेमुळे प्रत्यक्ष क्षेत्रस्तरावरील गस्त, निरीक्षण आणि वन्यजीव व्यवस्थापनातील त्रुटी स्पष्ट झाल्याचे दिसून येते.

मृत बछडे हे टी-१३० या वाघिणीची असून, त्यांचे वय अंदाजे आठ महिन्यांचे होते. वनाधिकाऱ्यांनी सांगितले की, या बछड्यांचा मृत्यू एका प्रौढ नर वाघाच्या आंतरप्रजाती संघर्षात (टेरिटोरियल फायट) झाल्याचा अंदाज आहे.

बछड्याची कातडी पूर्णपणे निघून गेली असल्यामुळे ओळख पटवणेही अवघड झाले होते.

पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, हा बछडा किमान दहा दिवसांपूर्वी मृत्युमुखी पडला असावा. त्यामुळे मुख्य व्याघ्र क्षेत्रात एवढ्या काळापर्यंत मृत बछडा कोणालाही दिसला नाही, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) आणि मुख्य वन्यजीव संरक्षक एम. एस. रेड्डी यांना या घटनेची तात्काळ माहिती देण्यात आलेली नव्हती.

सूत्रांच्या माहितीनुसार, सुमारे १२ तासांनी, रात्री आठच्या सुमारास मृत्यू प्रकरण बंद करण्याची परवानगी मागितल्यावरच त्यांना याची कल्पना झाली. त्यानंतर प्राथमिक गुन्हा नोंद (पीओआर) दाखल करण्यात आली.राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणालाही मृत बछड्याची माहिती उशिरा दिली गेली. नागपूर वनवर्तुळात अवघ्या सात दिवसांत हे तिसरे वाघ मृत्यूचे प्रकरण आहे. जानेवारीच्या सुरुवातीला वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यातील एका वाघाचा वीज प्रवाहामुळे मृत्यू झाला होता आणि त्याचा मृतदेह तलावात टाकण्यात आला होता, ज्यामुळे पुरावे नष्ट झाले. अद्यापही दोषी सापडलेले नाहीत.

# महानगरपालिका निवडणूक क्षेत्रात १५ जानेवारी रोजी सार्वजनिक सुटी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित मतदान क्षेत्रात १५ जानेवारी २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याची अधिसूचना राज्य शासनाने प्रसिद्ध केली आहे.

अधिसूचना सर्व विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, मंडळे इत्यादींच्या निदर्शनास आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही सार्वजनिक सुट्टी संबंधित महानगरपालिका निवडणूक क्षेत्रातील मतदारसंघाबाहेर कामानिमित्त असलेल्या मतदारांनाही लागू राहणार आहे. महानगरपालिका क्षेत्रांतील केंद्रशासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका व तत्सम आस्थापनांनाही ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या महानगरपालिकांमध्ये बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, कल्याणझडोंबिवली, भिवंडीझनिजामपूर, मीराझभाईंदर, वसईझविरार, पनवेल, नाशिक, मालेगाव, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, पुणे, पिंपरीझचिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगलीझमिरजझकुपवाड, छत्रपती संभाजीनगर, नांदेडझवाघाळा, परभणी, जालना, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर यांचा समावेश आहे. मतदारांनी मतदानासाठी लोकशाहीच्या उत्सवात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद निवडणुकांचा मुहूर्त लांबणीवर?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :

नगर पंचायत व नगर परिषदांच्या निवडणुका पार पडल्या. महानगर पालिकांच्या निवडणुका सुरू आहे. फक्त जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका शिल्लक आहे. या निवडणुकांबाबत ग्रामीण भागातील नेत्यांमध्ये मोठी उत्सुकता आहे.

याच महिन्यात त्या लागतील, असा अंदाज होता. परंतु त्याला मुहूर्त टळला आहे. या निवडणुकांवरून संभ्रम असला तरी सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या तारखेत त्या होत नसल्याचे दिसते. येत्या महिन्यात त्या होणार नसून एप्रिल, मे महिन्यात होतील, अशी चर्चा आता प्रशासकीय वर्तुळात आहे.

सर्वोच्च न्यायालयाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पूर्वी घेण्याचे आदेश दिलेत. नगर पंचायती व नगर परिषदांच्या निवडणुका पार पडल्या. महानगर पालिकांच्या निवडणुका सुरू आहेत. या सर्व निवडणुकांना एका महिन्याचा कालावधी देण्यात आला आहे.

ते लक्षात घेता ३१ जानेवारीपूर्वी जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणार नसल्याचे स्पष्ट चित्र आहे. फेब्रुवारी व मार्च महिन्यात १० वी व १२ वी च्या परीक्षा असतात. या काळात निवडणुका घेत नाही. त्यामुळे जिल्हा परिषदांच्या निवडणुका एप्रिल, मे महिन्यात होतील, अशी चर्चा आहे.

अनेक जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची टक्केवारी ५० वर गेली आहे. तर १२ जिल्हा परिषदांची टक्केवारी ही ५० च्या आत आहे. यापूर्वीच आरक्षणाची टक्केवारी ५० वर गेल्याने नागपूरसह सहा जिल्हा परिषदांमधील ओबीसी आरक्षण रद्द करण्यात आले होते. ओबीसी सदस्यांचे सदस्यत्वही रद्द करण्यात आले होते. त्या सर्व जागा खुल्या वर्गात वर्ग करून नव्याने निवडणुका घेण्यात आल्या होत्या. तोच निर्णय येथेही लागू होणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# आमदार प्रकाश भारसाकळे यांना भाजपमधून हाकला

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ८ :

माजी आमदार अभिजीत अडसूळ यांची मागणी



विधानसभा निवडणुकीच्या वेळी प्रकाश भारसाकळे हे भाजपचे आमदार असताना देखील माज्या विरोधात त्यांनी प्रचार केला, व्हीडिओ प्रसारीत केले. खरे तर तेव्हाच भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांची पक्षातून हकालपट्टी करायला हवी होती. पण, त्यांच्यावर कारवाई झाली नाही. आपण काहीही करू शकतो, असा त्यांचा अविर्भाव आहे. त्यांची पक्षातून हकालपट्टी करावी, अशी मागणी शिवसेना शिंदे गटाचे नेते माजी आमदार अभिजीत अडसूळ यांनी केली आहे.

अभिजीत अडसूळ यांनी भाजपच्या नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांच्यावरही टीका केली. ते म्हणाले, नवनीत राणा या अमरावतीत काही ठिकाणी युवा स्वाभिमान पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार करीत आहेत. चक्रव्यूहात अडकलेल्या अभिमन्यूसारखी स्थिती अमरावतीत भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची झाली आहे.

# पत्नीला जिवंत जाळले

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. ८ :



महाकाली प्रभागातील गौतम नगर येथे पती शुभम भडके (२८) याने पत्नी दीक्षा भडके (२७) हिला जिवंत जाळल्याची धक्कादायक घटना येथे घडली. दरम्यान दीक्षा हिचा उपचारादरम्यान मृत्यु झाल्याने एकच खळबळ उडाली आहे.

याप्रकरणी शहर पोलीसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून पती शुभम भडके याला अटक केली आहे. शहर पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार कमला समय्या भडके (७०), रा गौतम नगर, चंद्रपूर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांची नात दीक्षा शुभम भडके (२७) ही आजीसमवेत राहत होती.

दीक्षाचा विवाह पाच वर्षांपूर्वी शुभम राजू भडके (२८) याच्याशी झाला होता. मात्र मागील सहा ते सात महिन्यांपासून पती-पत्नीमध्ये सतत वाद होत असल्याने शुभम हा आई-वडिलांकडे वेगळा राहत होता. ५ जानेवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ८ वाजता कमला भडके या बहिणीकडे गेल्या होत्या. रात्री ९ वाजताच्या सुमारास त्या घरी परतल्या असता घराचा दरवाजा बाहेरून बंद असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यावेळी घरातून मला वाचवा.. असे ओरडत असल्याचा आवाज येत होता. दरवाजा उघडून आत प्रवेश केला असता दीक्षा ही गंभीर अवस्थेत विव्हळत होती. कपडे व केस जळालेले होते.

कमला भडके यांनी तात्काळ दीक्षाला शासकीय वैद्यकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असताना बुधवार ७ जानेवारी २०२६ रोजी दीक्षाचा मृत्यू झाला. या प्रकरणी सुरुवातीला चंद्रपूर शहर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १०९(१) अंतर्गत गुन्हा दाखल केला होता.

मात्र दीक्षाचा मृत्यू झाल्यानंतर गुन्ह्यात कलम १०३ अंतर्गत खुनाचा गुन्हा वाढविण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी शुभम राजू भडके याला अटक केली आहे.

## लोकरंग

# क्रांतिज्योतीची पोरं महाराष्ट्रभर ठरली सुपरहिट!




मराठी शाळेच्या अस्मितेला नवा आवाज देणारा क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला असून, प्रदर्शित होताच चित्रपटगृहांमध्ये जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर या चित्रपटाची जोरदार चर्चा सुरू आहे. तसेच सोशल मीडियावर व बुक माय शोवर चित्रपट ट्रेंडिंग ठरत आहे.

या चित्रपटाने पहिल्याच वीकेंडला तब्बल ३.९१ कोटींचा गल्ला जमवला आहे. जोरदार कमाई करत हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे.

पहिल्याच दिवसापासून अनेक शहरांमध्ये चित्रपट हाऊसफुल जात असून, मराठी शाळेच्या आठवणींमध्ये रमलेले प्रेक्षक भावुक होऊन चित्रपटगृहातून बाहेर पडताना दिसत आहेत. चित्रपटातील आशय, संवाद, भावनिक क्षण आणि वास्तववादी मांडणी यामुळे प्रेक्षकांशी थेट नाळ जुळली आहे. लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सगळ्यांनीच या चित्रपटाला डोक्यावर घेतले आहे.

चित्रपटाच्या प्रभावी कथेची मांडणी, कलाकारांची नैसर्गिक अभिनयशैली, मनाला भिडणारे संगीत आणि प्रत्येक फ्रेममधून जाणवणारी मराठी मातीची ओढ यामुळे हा चित्रपट केवळ एक सिनेमा न राहता एक अनुभव ठरत आहे. समीक्षकांकडूनही या चित्रपटाला भरभरून दाद मिळत असून मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक नामवंत कलाकारांनी सोशल मीडियावरून या चित्रपटाचे भरभरून कौतुक केले आहे.

प्रेक्षकांकडून दिग्दर्शक हेमंत ढोमे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, राज्यभरातून त्यांना कौतुकाचे मेसेजेस आणि शुभेच्छा मिळत आहेत. अनेक प्रेक्षक चित्रपट पाहिल्यानंतर थेट दिग्दर्शकांना भेटण्याची इच्छा व्यक्त करत आहेत, हीच या कलाकृतीच्या यशाची खरी पावती ठरत आहे.

■ ■ ■

# वकील बनून सत्यासाठी लढणार राजसी भावे



विविध चित्रपट आणि नाटकांमधून लक्षवेधी भूमिका साकारणारी युवा अभिनेत्री राजसी भावे आता वकील बनून सत्यासाठी लढणार आहे.

तिचा हा लढा नेमका कशासाठी आणि कोणासाठी आहे? हे जाणून घ्यायचं असेल तर जानेवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणारा केस नं. ७३ हा चित्रपट पहावा लागेल. आपल्या या भूमिकेबद्दल बोलताना राजसी सांगते, ह्यअतिशय प्रामाणिक आणि तत्वनिष्ठ क्रिमिनल वकिलाची ही भूमिका आहे. मधुरा इनामदार असं तिच्या व्यक्तिरेखेचं नाव असून तिच्या येण्याने केस नं. ७३ गुंता कसा सुटणार? हे पहाणं रंजक असणार आहे. सातत्याने होणाऱ्या काही हत्यांच सत्रनाट्य कोर्टापर्यंत येऊन पोहोचलं आहे.

याची उकल एक तडफदार वकील म्हणून करताना यात माझ्या व्यक्तिमत्वाचे वेगवेगळे कंगोरे पहायला मिळणार आहेत. वकिलांची देहबोली, त्यांचे व्यक्तिमत्व याच्या निरीक्षणातून ही भूमिका साकारण्याचा प्रयत्न मी केला आहे. लायलॅक मोशन पिक्चर्स आणि डस्क स्टुडिओज निर्मित केस नं. ७३ हा मराठी चित्रपट नवीन वर्षात जानेवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन डॉ. मिलिंद मुक्तेश्वर आपटे यांनी केले असून अशोक शिंदे, राजसी भावे, शैलेश दातार, नंदिता पाटकर, पियुष आपटे अशी तगडी स्टारकास्ट चित्रपटात दिसणार आहे.

■ ■ ■

# शिल्पा शिंदे यांनी मालिका 'भाबीजी घर पर है 'मध्ये आणली डबल धमाल!



मालिका 'भाबीजी घर पर है २.०'मध्ये हास्य व उत्साहपूर्ण मनोरंजन मिळणार आहे. मालिकेने भयावह, पण विनोदी वळण घेतले आहे, जेथे विभुती (आसिफ शेख), अनिता (विदिशा श्रीवास्तव), तिवारी (रोहिताश्व गौड) आणि अंगूरी (शिल्पा शिंदे) भूतांच्या गोंधळात आणि धक्कादायक ट्विस्ट्समध्ये अडकतात. यामध्ये अधिक भर म्हणजे शिल्पा शिंदे यांनी डबल रोल साकारला आहे, जेथे प्रेमळ अंगूरी भाबी आणि घडत असलेल्या भयावह घटनांमागील रहस्यमय विद्याच्या भूताची भूमिका साकारत आहेत.

कॉमेडीमध्ये अलौकिक शक्तीची भर झाली आहे. अशाच एक अंचबित करणारे सत्य समोर येते, भाबीजी स्वतः मूर्तीवाली भूतनी आहे का? डबल रोल साकारण्याबाबत शिल्पा शिंदे म्हणाल्या, ''घुंघटगंज एपिसोड पूर्णपणे डबल धमाका आहे, ज्यामध्ये रहस्य, विनोद आणि अनपेक्षित ट्विस्ट आहेत. यामध्ये कॉमेडी व हॉररचे धमाल आणि रोमांचक मिश्रण आहे, जे प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेईल. अंगूरीमध्ये विशेष जादू व प्रामाणिकपणा आहे, जे नेहमी प्रेक्षकांना आवडते आणि तिची भूमिका पुन्हा एकदा साकारताना माज्या जीवनातील अत्यंत विशेष भागाला पुन्हा भेट देत असल्यासारखे वाटत आहे. यामध्ये अधिक उत्साहाची बाब म्हणजे मी यावेळी अंगूरी भाबीव विद्या अशा दुहेरी भूमिका साकारत आहे.

■ ■ ■

# मर्दिनी चित्रपटाचा मुहूर्त शॉट संपन्न




श्री स्वामी समर्थ आणि गणपती बाप्पाच्या आशीवार्दाने आगामी मराठी चित्रपट मर्दिनीचा मुहूर्त शॉट पार पडला. या प्रसंगाने चित्रपटाच्या निर्मिती प्रवासाला अधिकृत सुरुवात झाली असून, दमदार विषय आणि प्रभावी मांडणी घेऊन मर्दिनी हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीस येण्यासाठी सज्ज होत आहे.

श्रेयस तळपदे आणि फ्लुएन्स मोशन पिक्चर्स प्रा. लि. प्रस्तुत या चित्रपटाची कथा मनोरंजनाच्या पलीकडे, प्रत्येक स्त्रीच्या सामर्थ्याची, सहनशक्तीची आणि शक्तीची गाथा उलगडते.प्रत्येक स्त्री ही मुळात मर्दिनी असतेझवेळ आली की रूप दाखवते. या चित्रपटात सुंदर आणि चमकदार कलाकारांचा संगम आहे, ज्यांच्या कामगिरीमुळे कथा अधिक प्रभावी आणि आठवणींमध्ये राहणारी बनेल. प्रार्थना बेहेरे, अभिजीत खांडकेकर, जितेंद्र जोशी, राजेश भोसले यांसारख्या दमदार कलाकारांसह बालकलाकार मायरा वैकुळची सुद्धा महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

अनुभवी कलाकारांची ताकद आणि नव्या पिढीची संवेदनशील उपस्थिती यामुळे मर्दिनी हा चित्रपट आशय, अभिनय आणि सादरीकरणाच्या दृष्टीने एक वेगळा आणि प्रभावी सिनेमॅटिक अनुभव देईल. मर्दिनी चित्रपट येत्या २०२६ साली प्रेक्षकांच्या भेटीस मोठ्या पडद्यावर येत आहे. ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# केवळ १४ हजार एकल महिला?

## फेर सर्वेक्षण करा हेरंब कुलकर्णी यांची मागणी

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ८ :



भंडारा : जिल्हा परिषदेमार्फत जिल्ह्यातील एकल महिलांच्या स्थितीचे सर्वेक्षण करण्यात आले असून या सर्वेक्षणात भंडारा जिल्ह्यात केवळ १४ हजार २१० एकल महिलांची नोंद झाली आहे. राज्यात लोकसंख्येच्या तुलनेत लहान असलेल्या जिल्ह्यांमध्ये एकल महिलांची संख्या मोठी असताना भंडारा जिल्ह्यातच अत्यंत कमी नोंद झाल्याने सर्वेक्षणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

प्रशासकीय उदासीनतेमुळे थातूरमातूर आणि ढिसाळ पद्धतीने सर्वेक्षण झाल्याचा आरोप एकल महिला पुनर्वसन समितीचे प्रणेते हेरंब कुळकर्णी यांनी केला आहे. ही आकडेवारी निराशाजनक असून फेर सर्वेक्षण करण्यात यावे अशी मागणीही कुलकर्णी यांनी केली आहे.

# भावाचा खून करून रेल्वे रूळावर फेकला मृतदेह

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. ८ :

घरात वाद झाल्याने राग अनावर होऊन मोठ्या भावाने धाकट्याची डोक्यावर लोखंडी वस्तूने वार करून निर्घून हत्या केली.

या हत्याकांडातील पुरावे नष्ट करण्याच्या अनुषंगाने मृतकाचे शव रेल्वे रूळावर टाकून अपघातात भाऊ दगावल्याचे चित्र रंगविण्यात आले. मृत धाकट्या भावाचे नाव गणेश विश्वनाथ भोयर (२५ ) असे आहे.

आरोपी भाऊ गुरूदास विश्वनाथ भोयर (२७), वडील विश्वनाथ झुंगा भोयर (७१) व आई कौशल्या विश्वनाथ भोयर (५५) यांना बल्लारपूर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. विश्वनाथ भोयर यांची कौशल्या ही दुसरी पत्नी आहे. त्यांना पहिल्या पत्नीचे दोन मुले व दुसऱ्या पत्नीचे दोन मुले आहे. यातील पहिल्या पत्नीचे दोन्ही मुले वेगवेगळे राहत आहे. मात्र विश्वनाथ, कौशल्या,गुरूदास व गणेश एकत्र राहत होते.

रात्री गणेश व गुरूदास या भावंडांत दारू पिऊन भांडण झाले. ते विकोपाला गेले. रागाच्या भरात गुरूदासने गणेशच्या डोक्यावर लोखंडी वस्तूने प्रहार केला. रक्ताच्या थारोळ्यात गणेश जागीच कोसळला. तो मृत झाल्याची खात्री झाल्यावर घरातील तिघेही शांत झाले. मध्यरात्री १२ ते १ वाजता दरम्यान खुनातील पुरावे नष्ट करायची योजना आरोपींनी आखली. गुरूदास भोयर याने मृत गणेशच्या पायाला दोरी बांधून गोंदिया झ बल्लारपूर रेल्वे मार्गावर ओढत नेले.

हा प्रकार रात्री गस्तीवर असलेल्या रेल्वे कर्मचारी दामाजी नरोटे यांच्या लक्षात आला. त्याने रात्री या घटनेची माहिती रेल्वे पोलिसांना दिली.रेल्वे पोलिसांनी बल्लारपूर ठाण्याच्या पोलिसासोबत संपर्क साधून घटनेबाबत अवगत केले. पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले आहे.

# निवडणूक प्रचार करताना युवकावर हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :

दक्षिण नागपुरातील प्रभाग ३१ मध्ये प्रचार करताना एका कार्यकर्त्यांवर विरोधीपक्षाच्या लोकांनी हल्ला केला. त्याला मोठ्या प्रमाणात मारहाण केली. त्याला चालता, बसता नव्हते. त्याला मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी त्याला कोतवाल पोलीस ठाण्यात बोलावले. मात्र, एफआयआर केले नाही.

जखमी युवक योगेश काळे यांनाच पोलीस दमदाटी करीत होते. प्रभाग क्रमांक ३१ मधील अपक्ष उमेदवार पूजा मानमोडे यांचा प्रचार हा युवक करत होता. प्रचारादरम्यान विरोधी पक्षाच्या उमेदवाराच्या कार्यकर्त्यांनी या युवकाशी बाचाबाची केली आणि त्याला बेदम मारहाण केली. त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली.

# बनावटी मद्य, गुटका, तंबाखूचा अड्डा उघडकीस

■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. ८ :



अस्सलचा पुरवठा कमी म्हणून की काय आता बनावटी माल मोठ्या प्रमाणात विकल्या जात असल्याचे उजेडात आले आहे. मादक पदाथार्चा कारखाना उघडकीस आला आणि राज्य शासनाने मोठ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली होती.

असे असूनही बनावट अंमली पदार्थ पोलिसांच्या नाकावर टिच्चून धडाक्यात विकल्या जात असल्याचे चित्र आहे. वर्धा जिल्ह्यात विषारी बनावट दारूने अनेकांचे बळी गेल्याचा इतिहास आहे. या पार्श्वभूमीवर नवनियुक्त पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांनी हे धंदे बंद करण्याचा चंग बांधला. आणि मोठ्या कारवाईत गोरख धंदा प्रकाशात आला आहे.

शासनाने प्रतीबंधीत केलेला सुगंधीत तंबाखु, गुटखा व दारूची अवैध विक्री करणा-या गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याचे स्थानिक गुन्हे शाखेस आदेश दिले. त्या अनुषंगाने अवैध व्यवसाय करणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करण्याची मोहिम सुरू झाली. बुधवारी पथक पोलीस स्टेशन समुद्रपुर हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना गोपणीय माहिती मिळाली.

सराईत गुन्हेगार अनिकेत उर्फ प्रकाश कांबळे रा. उबदा, तह. समुद्रपुर याचेवर धाड टाकली असता, त्याचे घरी काम करणारा आरोपी भुवेश उर्फ ताडा उर्फ योगेश मनोहर जिल्हारे, रा. उबदा हा सापडला.

आरोपी अनिकेत कांबळे व त्याचे घरासमोर असलेल्या आरोपी राहुल डोफे याचे घराची झडती घेतली तेव्हा झडती दरम्यान देशी-विदेशी दारूने भरलेल्या सिलबंद शिशा, बनावटी विदेशी दारू रॉयल स्टॅग कंपनीचे स्टिकर, रासायनिक द्रव,सुंगधीत तंबाखु व गुटखा,खाली शिशांचे झाकण व सिलींग अॅन्ड पॅकिजींग इलेक्ट्रिक मशीन व इतर साहित्य सापडले.

आरोपीच्या ताब्यातून देशी दारूच्या १३०० सिलबंद शिशा, विदेशी दारूच्या ६५ शिशा, सुगंधीत तंबाखु व पान मसाल्याचे पॉकिटे, रासायनिक द्रव्य व मशिनसह ४ लाख ५३ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.